संस्थापक :
साने गुरुजी

# साधना

शनिवार
१७ जानेवारी २००९
मूल्य रु. ८/-

## धर्मनिरपेक्षता आयोग : तातडीची गरज

राज्यघटनेत नमूद केलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या उद्दिष्टाची जपवणूक केली जावी आणि या उद्दिष्टावरील जनतेचा विश्वास पुनर्स्थापित व्हावा यासाठी एका धर्मनिरपेक्षता आयोगाची स्थापना करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

असा आयोग परिणामकारक ठरण्यासाठी राज्यघटनेत दुरुस्ती करून या आयोगाची स्थापना करण्यात यावी व तिचे अध्यक्षपद भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायमूर्तींकडे असावे.

नैतिक अधिकारवाणीने बोलू शकतील व ज्यांच्याविषयी समाजातील सर्व थरांना आदर वाटतो असे राष्ट्रीय पातळीवरील विश्वासार्ह नेते उपलब्ध नसल्याने, निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी धर्मनिरपेक्षता आयोग आदर्श तोडगा ठरू शकेल.

राजकीय पक्ष, सार्वजनिक संस्था, केंद्र व राज्य सरकारे, प्रसिद्धी माध्यमे व इतर यांच्या घोषणा, कृती व कार्यक्रम यांच्याद्वारे धर्मनिरपेक्षतेवर विपरीत परिणाम होणार असेल, तर त्यावर निर्णय देण्याची जबाबदारी या आयोगावर असेल.

राजकीय पक्षांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यांत, २००९ साली नवी लोकसभा अस्तित्त्वात आल्यावर, असा आयोग स्थापन करण्यासाठी आवश्यक ती घटनादुरुस्ती करण्याचे वचन द्यावे यासाठी एक देशव्यापी चळवळ उभारावी लागेल.

**निवृत्त केंद्रीय गृहसचिव माधव गोडबोले यांचा विशेष लेख...**



# वारी एक आनंदयात्रा

**बुकशेल्फ २००८ वर्षभराचा आढावा घेताना लक्षवेधी ठरलेल्या पहिल्या दहा पुस्तकात समावेश झालेले पुस्तक.** (शिफारस - मुंबई टाइम्स)

## संवाद तरुणाईशी

तरुण पिढीच्या पालकत्वाविषयी

रेणू दांडेकर

किंमत १०० + पोस्टेज ३० रुपये

वयात आलेल्या आपल्या मुलांबरोबर वागताना-जगताना आई-वडिलांना अनेक प्रश्न पडतात, ताणतणाव तयार होतात, वाद होतात. असे घडायला नको म्हणून या वयातल्या पालकत्वाविषयीचा विचार या पुस्तकातून केला आहे.



## थोर चित्रकार चोर

अनु. दीपक घारे

किंमत १३० + पोस्टेज ३० रुपये



पिकासो, शगाल अशा प्रख्यात चित्रकारांच्या शैलीची सही सही नयकल करणाऱ्या डेव्हीड स्टीनच्या आत्मकथनाच्या निमित्ताने आधुनिक चित्रकला, कलेचा बाजार आणि त्यातल्या अनिष्ट प्रवृत्ती यांचा एक रोचक आलेख या पुस्तकात येतो.

मोहक भूलथापांना बळी न पडता खरे उपचार काय, याचा शोध घ्यायला मदत करणारा हा विक्रम वेताळ संवाद! वेताळ कथांइतकाच रसपूर्ण आणि उद्बोधकही.



## वेताळाच्या आरोग्यकथा

रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ

किंमत १६० + पोस्टेज ३० रुपये



सर्व प्राणीमात्रांना जगविणाऱ्या भूमीशी एकरूप होऊन गेलेल्या शेतकऱ्याचे आणि त्याच्या कष्टप्रद व मातीने माखलेल्या जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडविणारे अनोखे आणि अद्वितीय पुस्तक.

## तिफनसाज

इंद्रजित भालेराव

किंमत १६० + पोस्टेज ३० रुपये

**साधनाच्या सभासदांना मनोविकासची सर्व पुस्तके २५% सवलतीत**

खालील पत्त्यावरच मनोविकासची सर्व पुस्तके मिळतील.

मनोविकास प्रकाशन

३ए शक्ती टॉवर्स, ६७२नारायण पेठ, पुणे३० फोन -०२०-६५२६२९५० मुंबई-०२२-६४५०३२५३

मनोविकास बुक सेंटर, आमदार निवास आवार, चर्चगेट, मुंबई मोबाईल-९९६७०८१५२७

# असत्यमेव जयते !

भारताच्या आयटी क्षेत्रातील द्वितीय क्रमांकावरील 'सत्यम कम्प्युटर्स' या कंपनीत ८००० कोटी रुपयांचा गडबड घोटाळा झाला असून, त्यामागील सूत्रभार रामलिंगम राजू यांना अटक झालेली आहे. राजू हे सत्यमचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक होते. त्यांनी 'मी कित्येक वर्षे खोटारडेपणा व गैरव्यवहार करीत होतो' अशी कबुली दिली आहे. विशेष म्हणजे २००८ सालचा कॉर्पोरेट गव्हर्नन्सबद्दलचा 'कौन्सिल ऑफ इन्स्टिटयूट ऑफ डायरेक्टरर्स'चा गोल्डन पीकॉक पुरस्कार सत्यमला मिळालेला आहे! असल्या बोगस कंपनीला हे बक्षीस दिले गेलेच कसे, असा प्रश्न उद्‌भवतो. पण आजकाल भारतरत्नापासून ते सटाणाभूषणपर्यंतचे अनेक पुरस्कार मॅनेज केले जातात. चित्रपट असो वा पत्रकारिताविषयक पारितोषिक असोत; कोणाचाही गौरव केला जातो. भल्याबुऱ्या मार्गाने, फिक्सिंग करून एकमेकांच्या पाठी खाजवायच्या ही प्रचलित संस्कृती आहे. तिला धरून राजूंनी कित्येक बक्षीसे पटकावली, आपली आरती करणारे लेख छापून आणले. या जगात पैशाच्या बळावर काय वाट्टेल ते करता येते, हे त्यांनी दाखवून दिले. परंतु डिसेंबर २००८ मध्ये त्यांनी मुलांनी स्थापन केलेल्या दोन इन्फ्रास्ट्रक्चर कंपन्यांच्या खरेदीचा त्यांचा निर्णय वादग्रस्त ठरला. त्यामुळे त्यांना व्यवस्थापकीय संचालकपदाचा त्याग करणे भाग पाडले. ७ जानेवारी २००९ रोजी सेन्सेक्स ७४९ नी कोसळला व सत्यमचा भाव ७८% नी आदळला.

गेली काही वर्षे सत्यम आपला नफा वाजवीपेक्षा जास्त फुगवून दाखवत होती. नफ्याची चूक सुधारून ताळेबंद पत्रकातील उणीवा दूर करण्याचे सारे प्रयत्न फसले. 'मी वाघाच्या पाठीवर स्वार झालो होतो. त्यामुळे वाघाकडून फस्त झाल्याविना खाली कसे उतरावे हे मला माहीत नव्हते. त्युामळे आता मी कायद्याला शरण जात असून, कोणत्याही परिणामांचा सामना करण्याची माझी तयारी आहे,' असे उद्‌गार राजू यांनी काढले आहेत.

३० सप्टेंबर २००८ रोजी कंपनीच्या ताळेबंदपत्रकात दाखविलेली शिल्लक रोख व बँकेतील ठेव असे मिळून होणारी ५०४० कोटी रुपये गंगाजळी ही वाजवीपेक्षा फुगविलेली आहे. ३७६ कोटींचे व्याज उत्पन्न व १२३० कोटी रुपयांचे कर्ज दायित्व आणि ४९० कोटी रुपयांचे ऋणही अवास्तव असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. बनावट हिशेब सादर केले जात असताना, त्यांना लेखी संमती देणारे ऑडिटर्स ढाराढूर झोपले होते का? 'प्राइस वॉटर हाऊस कूपर्स' ही जगविख्यात कंपनी ऑडिटचे काम बघते. याबद्दल तिला जबाबदार ठरवून तात्काळ व्यवसायातून हद्दपार केले पाहिजे. एन्रॉन व इतर अनेक कंपन्यांची देशविदेशांतील उदाहरणे बघितल्यास चार्टर्ड अकौंटंटस व ऑडिटर्स हे फसवाफसवीच्या उद्योगात आघाडीवर असल्याचे दिसून आले आहे. पुन्हा तोंड वर करून 'सरकारने अमुक करावे, तमुक करावे' असा सल्ला देण्यात तेच अग्रभागी असतात.

**स्थापण्या**
**समता शांती**
**ठेवुनी शुद्ध**
**साधनां ।**
**करिती साधना**
**त्यांना ठेवो**
**उत्स्फूर्त**
**साधना**


**१७ जानेवारी २००९**
वर्ष ६१ / अंक २३

● संपादक :
**नरेंद्र दाभोलकर**

● युवा संपादक :
**विनोद शिरसाठ**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी साथीदार प्रिंटर्स, पुणे ३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ.गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, (०२०) २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स : २४४३२४०२
  E-mail : weeklysadhana@gmail.com साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५९६३५ / ४१
  web : www.sadhanatrust.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/-
- (अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
- मुखपृष्ठ : शेखर गोडबोले : Mob. 9822503398

राजू यांच्या बोगसगिरीमुळे सत्यमचे करोडो गुंतवणूकदारीं पुरते खड्ड्यात गेले आहेत. कंपनीच्या ५१ हजार कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंध:कारमय आहे. कंपनीचे पुरवठादार गर्तेत लोटले गेले आहेत. भारतीय आयटी उद्योगाची व एकूणच भारताची लाज गेली आहे. डाव्होसच्या परिषदेत आपण ब्रँड इंडियाचा ढोल कितीही पिटला, तरी त्याचा उपयोग आता शून्य आहे.

आपल्याकडे मुळात आयटी कंपनी म्हटले की, लोक पहिल्या प्रथम कानाच्या पाळ्या पकडून वंदनच करतात. सिव्हिल वा मेकॅनिकल इंजिनिअर्स, वैज्ञानिक यांच्यापेक्षा आयटीला पहिले स्थान मिळाले. आयटीतून निर्यात उत्पन्न मिळते, पगार चांगले असतात हे ठीक आहे, पण म्हणून इतर क्षेत्रातील कंपन्यांपेक्षा आयटी कंपन्या अधिक आदर्श व सरस ठरतात, असे नव्हे. मुलीसाठी आयटीतलच नवरा पाहण्यापर्यंत आपली मजल गेली आहे!

सत्यमने वास्तवातल्यापेक्षा कागदावर जास्त राखीव निधी दाखविला. नफा फुगवून दाखविला. शिवाय सत्यममधील निधी आपल्याच पोरांच्या 'मेटास प्रॉपर्टी' व 'मेटास इन्फ्रास्ट्रक्चर' या कंपन्या खरीदण्यासाठी वापरण्याचे ठरविलेले. या दोन कंपन्यांचे व्हॅल्यूएशन फुगवून दाखविले.

रामलिंगम राजू यांनी हे सारे असत्यम का केले? एकतर ताळेबंद चकचकीत करून दाखविल्यास कंपन्यांच्या आयपीओला किंवा नवीन भांडवलविक्रीस चांगला प्रतिसाद मिळतो. कंपनीची प्रतिमा सुधारते. विदेशात नाव पोहोचते. नवीन ऑर्डर्स मिळतात. एखादी कंपनी टेक्ओव्हर करताना या प्रतिमेचा उपयोग होतो.

सत्यममधून या प्रकारे मिळविलेला पैसा मुलांच्या कंपनीत गुंतविणे, हा निव्वळ स्वार्थ झाला. शिवाय फारशी किंमत नसलेली 'मेटास' प्रचंड किंमतीने विकत घेणे हा लुच्चेपणा होता. हा जो सर्व निधी आहे, त्यातून राजू यांनी सहा-सात हजार एकर जमीन खरेदी केली. आपण ज्या आयटी क्षेत्रात काम करत आहोत, त्यात पुनर्गुंतवणूक करण्याऐवजी भलत्याच गोष्टीकडे तो वळविणे, यामधून बनवाबनवीची वृत्ती दिसते. ही लफंगेगिरी झाली.

कंपनीचे उत्पन्न, ऑपरेटिंग प्रॉफिट, येणे असलेले व्याज, रोख शिल्लक हे सर्व आकडे फुगवून दाखविले गेले. आयटी क्षेत्रातील एका अग्रगण्य कंपनीने हे करावे याचा गुंतवणूकदारांना धक्का बसला आहे.

सत्यमचे कर्तृत्व इतके उशिरा कसे बाहेर आले? याचे कारण म्हणजे, प्रवर्तकांनीही कंपनी विकायचे ठरवले होते. 'डीएसपी मेरि लिंच'ला ते काम सोपविले होते. टेक महिंद्र व एचसीएलने सत्यम खरीदण्याची तयारी दर्शविली. पण कंपनीच्या आर्थिक कामगिरीशी निगडित सवाल उपस्थित केले. समजा कंपनी आपण विकली व नंतर ही सारी बनवाबनवी उघडकीस आली, तर बिंग फुटायचे, असे राजू यांना वाटले. त्यामुळे त्यांनी स्वत:हूनच पापांची कबुली देऊन टाकली.

३१ मार्च २००८ साठी कंपनीने ८,८२२ कोटी रुपयांच्या मालमत्ता व तेवढीच देणी दाखविली होती. पण फुगवून सांगितलेल्या मालमत्ता वजा केल्या, तर कंपनीच्या निव्वळ मत्ता किंवा नेट वर्थ शन्यवत ठरत असल्याचे स्पष्ट झाले. सेबी, रिझर्व्ह बँक, कंपनी कामकाज खाते अशा विविध यंत्रणा असूनही सत्यमने असत्यमेव जयतेचा कितीही गजर केला, तरी त्याला काडीचा अर्थ नाही.

गंमत म्हणजे सत्यम ही कंपनी दहा वर्षांपासून न्यूयार्क स्टॉक एक्स्चेंजवर सूचीबद्ध करण्यात आली आहे. तिचे ऑडिट करणारी 'प्राइस वॉटर हाउस' ही मूळ अमेरिकन कंपनी आहे. म्हणजे भारताप्रमाणेच याबाबत अमेरिकेतही आनंदीआनंद आहे. याबाबतीत 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टस ऑफ इंडिया' तसेच 'कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया' यांच्यावरही नैतिक जबाबदारी येते. परंतु आपल्याकडे मेडिकल कौन्सिलसारख्या संघटनांप्रमाणेच हिशेब तपासनीसांच्या संस्था-संघटनाही त्यांच्या सदस्यांवर नियंत्रण ठेवण्यात कसूर करतात, अळीमिळी गुपचिळी हे बरे असते...

उदारीकरण आणल्यानंतर तरी कर चुकविणे, खोटे आकडे दाखविणे, हेराफेरी करणे हे प्रकार कमी व्हायला हवे होते, तसे घडलेले नाही. म्हणजे आधुनिकीकरणाबरोबर मानसिकता बदलली नाही. उद्योजकीय नव्हे, तर व्यापारी मनोवृत्ती (ट्रेडिंग मेंटॅलिटी)च राहिली.

कॉर्पोरेट क्षेत्रात पारदर्शकता आलेली नाही. या विषयावर सेमिनार्स होतात, टॉक शोज होतात. ताज-ओबेरॉयमध्ये परिषदा भरवल्या जातात. सी.के.प्रल्हाद, पंकज घेमावत मेघनाद देसाई प्रभृतींची लेक्चर्स ऐकून सूट-टायवाली मंडळी हाताचे पंजे परस्परांत गुंफून 'ओह, इट्स क्वाएट इंटरेस्टिंग, द चॅलेंज इज टु फिगर आऊट. हाऊ टु डू इट!' असे उद्गार काढतात आणि लगबगीने बारकडे वळतात. नंतर दुसऱ्या पेगपासून ते बराक ओबामा, लिंडसे लोहान, पॅरिस हिल्टन, लॅक्मे शो व वेळ उरला तर टेररिझमबद्दल बोलू लागतात. काही क्षण चिंताक्रांत होतात व गाडीत बसून निघून जातात... दुसऱ्या दिवशी कॉर्पोरेट गव्हर्नन्स, ट्रान्सपरन्सी हे विषय त्यांच्या सिस्टीममधून फ्लश आऊट झालेले असतात.

आपल्याकडे सूचीबद्ध कंपन्यांच्या अनेक उपकंपन्या असतात. प्रवर्तक कंपनीच्या काही सूचीबद्ध न झालेल्या (अन्लिस्टेड) कंपन्या असतात. त्यांच्यात आपापसांत गुंतागुंतीचे व्यवहार केले जातात. करचुकवेगिरी, लपवाछपवी यातच चालते. रिॲलिटी

कंपन्या स्पेशल परपज वेइकल कंपन्या स्थापन करतात व त्यांच्यामार्फत जमिनी खरेदी करून प्रकल्प राबवितात. हे प्रकल्प मग नवीन मूल्यांकन करून सूचीबद्ध कंपनीकडे हस्तांतरित केले जातात. त्याचे मूल्यांकन फुगवून दाखविले जाते. तसे ते केले की सूचिबद्ध कंपनीच्या मालमत्ता वाढतात. लोकांना वाटते, 'अरे केवढी मोठी कंपनी आहे.'

गेल्या दोन-चार वर्षांत रिॲलिटी कंपन्यांनी घेतलेल्या जमिनी, त्यांच्या वाढवून दाखविलेल्या किंमती, कृत्रिमपणे वाढविलेले जागांचे भाव आणि हिशेबात केलेली बोगसगिरी हे सर्वच तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. डीएलएफसारखी कंपनी ६०-६० हजार कोटी रुपयांच्या जमिनी खरीदते. हे भांडवल येते कुठून आणि ते जाते तरी कुठे?

काही उद्योगपती सूचीबद्ध कंपनीतील आपले शेअर्स प्रकल्पासाठी खर्च करतात. बँकांना मॅनेज केले की हे खपून जाते. कंपनीस तोटा झाल्यास तो दडवायचा व तो विदेशांतील अज्ञात उपकंपनीकडे वर्ग करायचा असले उपद्‌व्यापही चालतात. भारतातील निधी सायफन ऑफ करण्याची नवनवीन तंत्रे उद्योगपतींनी अवगत करून घेतली आहेत.

सत्यम कम्प्युटर्स महाघोटाळा करीत असताना संचालक मंडळावरचे स्वतंत्र संचालक (इंडिपेंडन्ट डिरेक्टर्स) त्याकडे डोळेझाक करून होते, अथवा त्यांना काय घडले याचा पत्ताच नव्हता. खरे म्हणजे राजू एकट्याच्या बळावर हे करू शकणार नाहीत, चार-दोन कोटी इकडेतिकडे झाले, तर समजू शकते. कारण सत्यमची उलाढालच प्रचंड आहे. पण शेकडो कोटी रुपयांचा ताळमेळ लागत नसतानाही कुणाच्या काहीच लक्षात येऊ नये? कंपनीचा सीएफओ, सीईओ, सीओओ (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर), संचालक, वरिष्ठ व्यवस्थापन यांचीही साथ होती का हे बघायला हवे.

रोख शिलकीबाबत तर खोटेपणा करता येत नाही. तोही केला गेला. तरीही सीईओ वा सीएफओ यांना त्याचा पत्ता नव्हता, यावर विश्वास बसत नाही. रामलिंगम्‌ राजू आपल्या मुलांची कंपनी भरमसाठ भाव देऊन विकत घेत होते, त्यास स्वतंत्र संचालकांनी आक्षेप कसा घेतला नाही?

कंपन्यांच्या स्वतंत्र संचालकांचा दैनंदिन कामकाजाशी संबंध नसतो. त्यामुळे यापुढे त्यांनी फक्त आकडे न पाहता कंपनीस भेट देऊन, संबंधितांशी बोलून वास्तव जाणून घेतले पाहिजे.

भारतात हर्षद मेहता, केतन पारेख, सी.आर.भन्साळी असे अनेक ठकसेन झाले. तीन-चार वर्षांपूर्वी डीमॅट घोटाळा झाला. एन्रॉनचा गैरव्यवहार मोठा होता. यात कुणालाही तातडीने शिक्षा झाली नाही.

रोखे गैरव्यवहार झाला तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग म्हणाले की, हे सिस्टीमचे फेल्यूअर आहे, पण सिस्टीम सुधारण्याचे प्रयत्न झाले नाहीत. भारतात सर्व प्रकारच्या यंत्रणा आहेत; पण प्रतिबंधक उपाययोजना केली जात नाही. म्हणजे गैरव्यवहाराचा कुणी प्रयत्न केला, तरी तो शोधून लगेच कारवाई होत नाही. गुंतवणूकदार, ठेवीदार वा ग्राहकांच्या प्रभावी संघटना नाहीत. घोटाळ्याचेही राजकारण होते व मग सगळे मिळून प्रकरणच दाबून टाकतात!

घोटाळे झाले की उदारीकरणावर बरसणारे नेते पुढे येतात. याचा त्याच्याशी काही संबंध नाही. देखरेख यंत्रणेच्या कार्यक्षमतेशी व एकूण औद्योगिक संस्कृतीशी याचा संबंध येतो.

गेल्या काही वर्षांत आमचे झगमगाटाचे आकर्षण वाढले. चार-दोन वर्षांत करोडो कमावणारे लोक आमचे आयडॉल्स बनले. त्यांच्या सक्सेस स्टोऱ्या प्रसिद्ध होऊ लागल्या. ज्याच्याकडे संपत्ती जास्त तो मोठा! समाजात त्याला प्रतिष्ठा. त्याला पुरस्कार. मीडिया त्याच्याभोवती नाचणार. प्रामाणिकपणा, नीतिमत्ता हे चेष्टेचे विषय ठरले. कशा का मार्गे का होईना; पैसे कमवा असे आदर्श तरुणांसमोर ठेवले गेले. फोर्बसच्या श्रीमंतांच्या यादीस महत्त्व आले. कुठल्या मार्गाने धन कमावले यापेक्षा अल्पावधीत कमावले ना, मग झाले. अशी आमची भूमिका बनली.

'दीवार'मधला विजय इन्स्पेक्टर भावाला विचारतो की, 'मेरे पास गाडी है, बंगला है, सबकुछ है, तुम्हारे पास क्या है?'

विजयने व्यवस्थेचा खोटेपणा अनुभवला आहे, म्हणूनच तो भल्याबुऱ्या मार्गाने धन कमावतो व त्या बळावर लोकांना विकत घेतो.

मात्र असल्या पैशामुळे शांती मिळत नाही, हा पैसा पचत नाही, सुख मिळत नाही...

रामलिंगम राजू एकटे नाहीत. असे जंटलमन बनलेले शेकडो राजू कॉर्पोरेट क्षेत्रात आहेत. त्यांनाही वठणीवर आणावे लागेल. हे सर्व कायदा, नियम यांच्या बळावर नाही होणार, लोकांच्या मानसिकतेत गुणात्मक परिवर्तन घडवून आणावे लागेल. श्रीमंत व्यक्तीपेक्षा प्रामाणिक, ईमानदार माणसांची यादी प्रसिद्ध करावी. अशी सूचना नारायणमूर्ती यांनी केली आहे.

राजकारणी व उद्योगपती एकाच माळेचे मणी आहेत, कुणी कुणालाही बोलावे अशी परिस्थिती उरली नाही.

**– हेमंत देसाई**



माधव गोडबोले

# धर्मनिरपेक्षता : राज्यघटनेतील तरतुदी आणि विदारक सत्य

**“**

**‘धर्मनिरपेक्षता हा भारतीय लोकशाहीचा श्वास आहे. आज तो घुसमटतो आहे. ही परिस्थिती बदलावी यासाठी साधना सदैव कार्यरत राहील.’ हे मनोगत ‘साधना’तर्फे हीरकमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात मा. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत व्यक्त करण्यात आले. त्यासाठीचे कृतिशील पाऊल म्हणून धर्मनिरपेक्षता आयोगाची स्थापना होणे महत्त्वाचे वाटते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात धर्मनिरपेक्षता आयोगाबाबतचे आश्वासन मिळवण्याचा प्रयत्न साधना (समविचारी संघटनांच्या सहकार्याने) करू इच्छिते. भारताचे निवृत्त गृहसचिव श्री. माधव गोडबोले यांनी त्याबाबतची मांडणी केलेला विशेष लेख प्रसिद्ध करीत आहोत.**

**”**

**प्रस्तावना :**

धर्माच्या आधारे भारताची फाळणी झाली. त्यानंतर उसळलेल्या भयानक हिंसाचारात दोन्ही समाजातील लोकांना अतोनात हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. हिंदू व मुसलमानांमध्ये कल्पनातीत कडवटपणा व अविश्वास निर्माण झाला, तरीही भारतीय राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेबाबत अतिशय समंजस तरतुदी करण्यात आल्या. त्यामुळे राज्यघटनेचे कौतुक व्हावे हे स्वाभाविकच आहे. विशेषत: पुढील तरतुदींचा उल्लेख करणे अगत्याचे वाटते :

*कलम १४ : (कायद्यापुढे सर्व समान),*
*कलम १५ : (धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांच्यावर आधारित भेदभावास मनाई),*
*कलम १६ : (सार्वजनिक नोकऱ्यात समान संधी),*
*कलम १९ : (भाषण स्वातंत्र्यासारख्या काही विशेष हक्कांना संरक्षण),*
*कलम २५ : (सदसद्‌विवेकबुद्धीनुसार वागण्याचे तसेच धर्म निवडण्याचे, तो आचरण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य),*
*कलम २६ : (धार्मिक बाबींच्या व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य),*
*कलम २७ : (एखाद्या विशिष्ट धर्माच्या उन्नतीसाठी कर देण्याचे स्वातंत्र्य),*
*कलम २८ : (विशेष संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य),*
*कलम २९ : (अल्पसंख्याकांना भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्यासाठी संरक्षण),*
*कलम ३० : (अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करून त्या चालवण्याचा हक्क), आणि*
*कलम ३५०अ, ज्याद्वारे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत मिळण्यासाठी सरकारने सुविधा स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.*

**मुसलमान मूलतत्त्ववाद्यांच्या दबावाखाली पुरोगामी बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांना व्हिसा नाकारणे, त्यांना भारताचे नागरिकत्त्व देण्यास नकार देणे हे सरकारच्या बेगडी 'धर्मनिरपेक्षते'चे आणखी एक उदाहरण आहे असे मानले जाते.**

काँग्रेस अध्यक्षांनी राज्य-घटनेत सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या समितीने (स्वरणसिंग समिती) १९७६ साली सादर केलेल्या अहवालात अशी शिफारस केली होती की, 'धर्मनिरपेक्षता व समाजवाद या कल्पना राज्यघटनेत स्पष्टपणे विशद कराव्यात.' त्यानुसार १९७६च्या ४२व्या घटनादुरूस्ती कायद्यानुसार, घटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप अधोरेखित करण्यासाठी राज्यघटनेच्या प्रस्तावनेत (प्रिॲम्बल) 'सार्वभौम प्रजासत्ताक राज्य' या शब्दांऐवजी यसार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक राज्य' असे शब्द वापरण्यात आले. याच घटनादुरुस्ती कायद्यानुसार ५१ अ हे मूलभूत कर्तव्यांसंबंधीचे कलम घालण्यात आले. त्यानुसार इतर बाबींबरोबरच धर्म, भाषा व प्रादेशिक आणि विभागीय विविधता यापलीकडे जाऊन सर्व जनतेत बंधुभाव व परस्पर सामंजस्य वाढवण्याचा प्रयत्न करणे व आपल्या वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशाचे जतन करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य ठरते. राज्यघटनेचे धर्मनिरपेक्ष स्वरूप हे राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याचा (बेसिक स्ट्रक्चर) भाग आहे व संसदेला ते बदलण्याचा, त्याचे महत्व कमी करण्याचा अथवा त्यावर निर्बंध घालण्याचा कोणताही हक्क नाही असे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांद्वारे ठामपणे प्रतिपादन केले आहे.

कायद्याचे राज्य, सर्वांना मताधिकार, स्वतंत्र न्यायसंस्था वगैरेसारख्या अनेक पाश्चिमात्य कल्पनांचा समावेश भारताच्या राज्यघटनेत करण्यात आला, त्याचप्रमाणे धर्मनिरपेक्षता हीदेखील भारताच्या इतिहासाला ज्ञात नसलेली पाश्चिमात्य कल्पनाच आहे. पण भारतीय राज्यघटनेत विशद केलेली ही धर्मनिरपेक्षता पाश्चात्यांच्या कल्पनेपेक्षाही निराळी आहे. निरीश्वरवाद, देवाचे अस्तित्व न मानणे किंवा अधर्माने वागणे असा या संकल्पनेचा अर्थ राज्यघटनेला अभिप्रेत नाही. कदाचित याच कारणाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा स्पष्ट उल्लेख राज्यघटनेत केला जावा, किंवा 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द प्रस्तावनेत घातला जावा यासाठी घटनासमितीत केलेले प्रयत्न अपयशी ठरले होते. भारताच्या संदर्भात धर्मनिरपेक्षता याचा अर्थ राज्याचा कारभार धर्माधिष्ठित नसेल आणि सर्व धर्मांना समान वागणूक मिळेल व त्यांचा समान आदर केला जाईल असा होतो. विशेष म्हणजे, या तरतुदी मूलभूत हक्कांचा (फंडामेंटल राईट्स) भाग असल्याने आपल्या धर्माप्रमाणे आचरण करणे, धर्मप्रसार करणे व स्वतंत्र शैक्षणिक संस्था स्थापन करून त्यांचे व्यवस्थापन पाहणे याबाबतचे हक्क अबाधित राखण्यासाठी - इतर मूलभूत हक्कांप्रमाणे, या हक्कांवरही सर्वोच्च न्यायालयाची देखरेख राहील अशी - अल्पसंख्यांकांना हमी मिळाली व स्वतंत्र मतदारसंघांची मागणी करण्यापासून त्यांना परावृत्त करता आले. प्रश्न हा आहे की - या कल्पना मुळापासून रुजल्या आहेत का आणि त्या प्रत्यक्षात कितपत उतरल्या आहेत.

धर्मनिरपेक्षता ही कल्पना जातीयतेपेक्षा (कम्युनॅलिझम) अधिक व्यापक आहे हे प्रथम लक्षात घेणे अगत्याचे आहे. 'जातीयता' हा धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेचा केवळ एक लहानसा हिस्सा आहे. भारताला आतापर्यंत जातीयतेशी ठामपणे मुकाबला करता आलेला नाही याचाच अर्थ घटनेत अभिप्रेत असलेली धर्मनिरपेक्षता आपल्याला सत्यात उतरवता आलेली नाही याचा पुरावा मानावा लागेल. १९८४ सालचे शिखांवरील हल्ले, २००२ मधील गोध्रा व गुजरातमधील इतर ठिकाणचे मुसलमानांवरील हल्ले, अनेक राज्यांत ख्रिस्तीधर्मीय व चर्चवर २००८ साली करण्यात आलेले हल्ले - या अलीकडील काळातील बहुसंख्याक जमातींनी अल्पसंख्यांकांवर केलेल्या अमानुष हिंसाचाराच्या घटना या दृष्टीने विशेष अस्वस्थ करणाऱ्या आहेत.

**धर्मनिरपेक्षतेचे मृगजळ :**

समाजाच्या सर्व थरांत धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेसंबंधी सार्वत्रिक भ्रमनिरास झालेला दिसून येतो. एका टोकाला धर्मनिरपेक्ष म्हणवून घेणाऱ्या अनेक राजकीय पक्षांच्या बेगडी, दिखाऊ धोरणांमुळे बहुसंख्यांकांमध्ये पसरलेला राग दिसतो, तर दुसऱ्या टोकाला अल्पसंख्यांकातील खदखदता असंतोष. 'या दिखाऊ धर्मनिरपेक्ष पक्षांचा एक कलमी कार्यक्रम म्हणजे मुसलमानांचा अनुनय' असे बहुसंख्यांकांमधील बऱ्याच मोठ्या गटाचे मत आहे. मुसलमान महिला (घटस्फोटांसंदर्भातील हक्कांचे संरक्षण) कायदा, १९८६, ज्याच्या पारित होण्यामुळे शहाबानो खटल्यातील (एआयआर् १९८५ एससी ९४५) सर्वोच्च न्यायालयाचा निकाल रद्दबातल ठरला, हा यासाठीचा सबळ पुरावा मानला जातो. कट्टरतावादी मुसलमान अशा तऱ्हेचा पुराणमतवादी कायदा करायला सरकारला भाग पाडू शकतात हेच याने सिद्ध झाले.

समान नागरी कायदा अस्तित्वात आणला जावा असे राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत सुमारे ६० वर्षांपूर्वीच नमूद केले असूनही असा कायदा करण्यासाठी धर्मनिरपेक्षतावादी पक्षांचा असलेला विरोध हे आणखी एक उदाहरण मानले जाते. बहुतेक सर्व धर्मांमध्ये एक समान तत्त्व दिसून येते ते म्हणजे स्त्री-पुरूषांबाबतची पक्षपाती भूमिका, असे अनेक स्त्री संघटना व इतरही वारंवार नमूद करीत आहेत. याविषयी योग्य ती पावले उचलावीत असे सर्वोच्च न्यायालयाने सरकारला अनेकदा आवाहन केले आहे. शाहबानो केसच्या संदर्भात न्यायालयाने म्हटले आहे की, 'न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या निरनिराळ्या निकालांद्वारे वैयक्तिक कायद्यांमध्ये असणारी मोठी दरी भरून काढून त्यातून समान नागरी कायदा तयार होऊ शकत नाही. प्रत्येक दाव्यासंदर्भात असा न्याय मिळावा यापेक्षा सर्वांना न्याय मिळावा अशी तरतूद अधिक समाधानकारक ठरेल.' सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन

न्यायमूर्ती व्ही. डी. तुळजापूरकर यांनी म्हटल्याप्रमाणे, 'जातीयतेच्या विषाचा सामना करण्याच्या संदर्भात समान नागरी कायद्याचे महत्त्व संशयातीत आहे; खरे तर जातीयतेच्या मुळावर घाव घालण्याच्या दृष्टीने हा एक न्यायिक तोडगा ठरेल. इतकेच नव्हे, तर सामाजिक न्याय आणि समान नागरिकत्त्व यासाठी आवश्यक अशा धर्मनिरपेक्ष शक्तींना यामुळे अधिक ताकद मिळेल. आपल्या राज्यघटनेला एकसंध समाज व समान नागरिकत्त्व अभिप्रेत असल्याने सर्व नागरिकांसाठी एकच समान नागरी कायदा असावा हेच योग्य आहे. देशातील सर्वात मोठ्या अल्पसंख्याक समुहातील मूलतत्त्ववादी, पुराणमतवादी आणि कट्टर धर्मपंथीयांच्या दबावाखाली मतपेटीच्या राजकारणाच्या दृष्टीने विचार करून अशा प्रकारची शरणागती पत्करण्याचे यासारखे दुसरे उदाहरण सापडणे कठीण आहे. अशा कृती करताना केवळ मंत्र म्हटल्याप्रमाणे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा जप करणे म्हणजे निव्वळ दांभिकपणा नव्हे काय? जेव्हा मूलतत्त्ववाद्यांवर प्रहार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या राजकीय इच्छाशक्तीचाच अभाव असेल, तेव्हा धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व प्रत्यक्षात आणणे शक्य होणार नाही.'[१]

**'देशद्रोही' आणि 'लाडावून ठेवलेले' अशी दोन्ही बिरुदे त्यांना एकाच वेळी वागवावी लागतात. ते 'देशद्रोही' व 'अतिरेकी' नसल्याचे त्यांना दररोज सिद्ध करावे लागते.**

सक्तीची विवाह नोंदणी व दत्तकविधान यासाठी समान कायदे करण्याच्या सूचना वेळोवेळी सर्वोच्च न्यायालयाने सरकारला केल्या आहेत. अनेक मुसलमान देशांत असे कायदे अस्तित्वात असूनही, मुसलमानांच्या विरोधामुळे असे कायदे करणे भारताला शक्य झालेले नाही.

बांगलादेशातून येणारे बेकायदा स्थलांतरितांचे लोंढे व त्यातून निर्माण होणाऱ्या राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीच्या व इतर प्रश्नांकडे या तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्षांच्या केंद्रातील सरकारने व आसाम, पश्चिम बंगाल आणि बिहार सरकारांनी स्वातंत्र्यानंतरच्या सहा दशकांत दुर्लक्ष केले आहे. उपलब्ध माहितीनुसार बांगलादेशातून आलेल्या बेकायदा स्थलांतरितांची संख्या आता दोन कोटींहून अधिक आहे. ते आता बांगलादेशच्या सीमावर्ती राज्यांपुरते मर्यादित नसून महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, दिल्ली, उत्तरप्रदेश वगैरेसारख्या दूरवरच्या राज्यांतही मोठ्या संख्येने पोचले आहेत. अशी धक्कादायक परिस्थिती असूनही मतपेटीच्या राजकारणामुळे केंद्रातील विविध सरकारांनी याबाबत काहीही कारवाई केलेली नाही. भारतीय जनता पक्षाने तथाकथित 'धर्मनिरपेक्ष' पक्षांना याबाबत अनेकदा दोष दिला असला तरी, भारतीय जनता पक्षप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारनेही या बाबतीत असेच दुर्लक्ष केले. अखेर, एका सार्वजनिक हित याचिकेद्वारे ही बाब सर्वोच्च न्यायालयासमोर आणण्यात आल्यावर 'बेकायदा स्थलांतरित ठरविणाऱ्या न्यायाधिकरणा'चा कायदा (आयएमडीटी) घटनाबाह्य ठरविण्यात आला. त्यानंतर देखील, अशी प्रकरणे 'परदेशी नागरिकांच्या' कायद्याखाली आणण्याऐवजी संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारचे अशी विशेष न्यायाधिकरणे चालू ठेवण्याचे प्रयत्न चालूच होते. यावरून हे 'धर्मनिरपेक्ष' पक्ष आपल्या मतपेटीच्या राजकारणासाठी देशाच्या सुरक्षेचा बळी देण्यासही तयार आहेत, या जनतेच्या मनातील भावनेला दुजोरा मिळाला. अखेर, आणखी एका सार्वजनिक हित याचिकेद्वारे ही बाब परत एकदा सर्वोच्च न्यायालयासमोर आणावी लागली व न्यायालयाने ही न्यायाधिकरणे बेकायदा ठरवली.

हाज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंना देण्यात येणारे अर्थसहाय्य २००८ साली ४५० कोटी रुपयांपर्यंत गेले आहे. इतर कोणत्याही धर्माच्या यात्रेकरूंना अशा प्रकारचे अर्थसहाय्य देण्यात येत नाही अशी हिंदुत्ववादी पक्षांची आणखी एक तक्रार आहे. याबाबतही एक सार्वजनिक हित याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

अतिरेकी कारवायांना तोंड देण्यासाठी कडक कायदे करण्यास या 'धर्मनिरपेक्ष' पक्षांचा विरोध आहे, कारण त्यामुळे मुसलमान दुखावले जाण्याची त्यांना भीती वाटते. हे तर्कविसंगत आहे. नरसिंह राव सरकारने 'टाडा' कायदा (टेररिस्ट अँड डिसरप्टिव्ह ॲक्टिव्हिटिज प्रिव्हेंशन ॲक्ट) मुसलमानांवर अन्याय होतो या कारणासाठी रद्दबातल होऊ दिला. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारने ते सत्तेवर आल्याबरोबर 'पोटा' कायदा (प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ॲक्ट) रद्द केला. त्यामुळे मतपेटीच्या राजकारणापुढे राष्ट्रीय सुरक्षा हितही दुय्यम ठरते या भावनेला बळकटी मिळाली. आतंकवाद्यांचा ठामपणे बिमोड करण्यासाठी काही राज्य सरकारांनी प्रस्तावित केलेल्या कायद्यांना केंद्राने अद्याप राष्ट्रपतींची संमती मिळू दिलेली नाही. केंद्र सरकार व त्याच पक्षांची राज्य सरकारे अतिरेक्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यास तयार नाहीत, कारण अशा गुन्ह्यांत अनेक मुसलमान संघटनांचा समावेश आहे अशी सार्वत्रिक भावना झाल्याने, या देशात धर्मनिरपेक्षता महत्त्वाची नाही असा मतप्रवाह दृढ होऊ लागला आहे. देशातील अनेक अतिरेकी कारवायात सिमींचा (स्टुडन्ट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया) सहभाग असण्याच्या पार्श्वभूमीवर, संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारमधील काही प्रमुख नेत्यांनी केंद्र सरकारने बंदी घातलेल्या या संस्थेला पाठिंबा देणारी वक्तव्ये केल्याने, अनेकांना धक्का बसला. शरिया न्यायालये ही समांतर न्यायव्यवस्था स्थापन करण्यास सरकारने दिलेली मूक संमती, हा मुसलमानांच्या अनुनयाचा आणखी एक पुरावा मानला जातो आणि त्यासंबंधीही सर्वोच्च न्यायालयात एक सार्वजनिक हित याचिका दाखल करण्यात आली आहे.

मुसलमान मूलतत्त्ववाद्यांच्या दबावाखाली पुरोगामी बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांना व्हिसा नाकारणे, त्यांना भारताचे नागरिकत्त्व देण्यास नकार देणे हे सरकारच्या बेगडी 'धर्मनिरपेक्षते'चे आणखी एक उदाहरण आहे असे मानले जाते.

बहुसंख्याक समाजाकडे मुसलमानांच्या अनुनयाच्या उदाहरणांची अशी लांबलचक यादी असली तरी स्वातंत्र्यानंतर त्यांना ज्या प्रकारच्या घटनांना सामोरे जावे लागले त्याबाबत मुसलमानही समाधानी नाहीत. बाबरी मशिदीत लपून-छपून, बेकायदेशीरपणे ठेवण्यात आलेल्या रामाच्या मूर्तीची पूजा करता यावी यासाठी, न्यायालयातील प्रलंबित केसचा पाठपुरावा करून, मंदिराचे कुलूप उघडण्यास परवानगी देऊन राजीव गांधींच्या केन्द्र सरकारने अप्रत्यक्षरित्या हिंदुत्ववादी पक्षांच्या रामजन्मभूमी आंदोलनाला प्रोत्साहन दिले, वादग्रस्त जमिनीवरील हिंदूंचा संशयास्पद दावा ग्राह्य मानून त्याआधारे त्यांना राममंदिराचा चौथरा बांधण्यास परवानगी दिली व नरसिंहराव सरकारने तर डिसेंबर १९९२ मध्ये बाबरी मशिद तोडली जात असताना तिचे संरक्षणही केले नाही, अशा मुसलमानांच्या काही गंभीर स्वरूपाच्या तक्रारी आहेत. या कारवायांद्वारे कॉंग्रेसला हिंदू मतदारांना खूष करायचे होते असे त्यांचे मत झाले आहे.

सरकारने मूलतत्त्ववादी व पुराणमतवादी मुसलमानांना खूष करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु त्यांच्यातील पुरोगामी व प्रगतीशील घटकांना पुरेसा पाठिंबा दिलेला नाही असे मुसलमानांच्या एका गटाचे मत आहे.

सच्चर समितीच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे सामान्य मुसलमानांची त्यांच्या दयनीय परिस्थितीसंबंधीची बोच खरोखर अस्वस्थ करणारी आहे. समितीने म्हटले आहे: भारतातील सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक जीवनातील स्थान भारतीय मुसलमानांसाठी काहीसे भयावह आहे. 'देशद्रोही' आणि 'लाडावून ठेवलेले' अशी दोन्ही बिरुदे त्यांना एकाच वेळी वागवावी लागतात. ते 'देशद्रोही' व 'अतिरेकी' नसल्याचे त्यांना दररोज सिद्ध करावे लागते. तथाकथित 'अनुनया'मुळे या समाजाची म्हणावी तशी सामाजिक व आर्थिक प्रगति झालेली नाही हे मान्य केले जात नाही. राहण्यासाठी विकत अथवा भाड्याने घर न मिळण्यापासून ते मुलांना चांगल्या शाळेत प्रवेश न मिळण्यापर्यंत मुसलमान असण्याचा त्यांच्या रोजच्या जीवनावर परिणाम होत असतो असे समितीने नमूद केले आहे. मुसलमानांकडे समाजातील काही घटक तर संशयाने पाहतातच, पण सार्वजनिक संस्था व सरकारी यंत्रणांचाही त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन संशयाचाच असतो अशी त्यांनी समितीकडे तक्रार केली. या सर्वांचा त्यांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होतो. समितीसमोर ज्या स्त्रियांनी आपले म्हणणे मांडले त्यांनी असेही सांगितले की बऱ्याच मोठ्या कंपन्यांमध्ये हिजाब वापरणाऱ्या महिलांना नोकरी मिळणे अधिकाधिक कठीण होत आहे. सरकारी नोकऱ्या, पोलिस व निमलष्करी दलांमध्ये मुसलमानांचे अत्यल्प प्रतिनिधित्त्व असणे ही त्यांची आणखी एक महत्त्वाची तक्रार आहे. बहुतेक सरकारी कार्यालयांत व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांत मुसलमान कर्मचाऱ्यांचे प्रमाण ५ टक्क्यांहूनही कमी आहे. सुरक्षेच्या भीतीमुळे देशभरातील मुसलमान अधिक प्रमाणात आपल्या स्वतंत्र 'घेटो'सारख्या वस्त्यांमध्ये राहू लागले आहेत. जातीयदृष्ट्या संवेदनशील असणाऱ्या गावांत व शहरांत हे अधिक लक्षात येते. मुसलमानांनी अशा स्वतंत्र वस्त्या निर्माण केल्याने महानगरपालिकांना व सरकारला त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे सोयीचे होते असेही समितीला सुचविण्यात आले. मुसलमान वस्त्यांत नागरी सुविधांचा अभाव असणे, स्थानिक राजकारणातील सत्तास्थानात व सरकारी अधिकाऱ्यांत त्यांचे पुरेसे प्रतिनिधी नसणे, पोलिसांनी त्यांच्यावर अत्याचार करणे - अशांमुळे त्यांना नेहमीच भेदभावाची वागणूक दिली जाते अशी भावना मुसलमान समाजात, विशेषत: तरुणांमध्ये, मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

अल्पसंख्यांकांना त्यांच्या मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण मिळावे ही जबाबदारी जरी राज्यघटनेने सरकारवर टाकली असली, तरी मुसलमान वस्त्यांमध्ये फारच थोड्या उर्दू शाळा आहेत अशी त्यांची रास्त तक्रार आहे. सरकारी व महापालिकेच्या प्राथमिक शाळांच्या अभावामुळे मुलांना मदरशात पाठवणे त्यांना भाग पडते.

मुसलमानांमध्ये गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असल्याचे सच्चर समितीला दिसून आले. सामान्यत: अनुसूचित जाती-जमातींपेक्षा त्यांची परिस्थिती केवळ काहीशीच बरी आहे. वेगवेगळ्या राज्यांतील मुसलमानांच्या परिस्थितीत फरक असला तरी, केरळ, आसाम, तामिळनाडू, ओरिसा, हिमाचल प्रदेश आणि पंजाब सोडल्यास इतर सर्व राज्यांतील शहरी भागातील मुसलमानांची परिस्थिती तुलनात्मकदृष्ट्या अधिक वाईट असल्याचे आढळते. त्यामानाने ग्रामीण भागातील त्यांची परिस्थिती काहीशी बरी आहे, पण अनुसूचित जाती-जमाती वगळता इतर सर्वधर्मीय समाजांपेक्षा मुसलमानांमध्ये गरिबीचे प्रमाण अधिक आहे.

या कारणाने आपल्या तक्रारींची दखल घेतली जावी यासाठी मुसलमानांनी अखिल भारतीय स्वरूपाचा राजकीय पक्ष स्थापन करणे गरजेचे असल्याचे मत सय्यद शहाबुद्दिनांसारखे अनेक महत्त्वाचे नेते आग्रहाने मांडतात. सय्यद अहमद बुखारींनी असा दावा केला आहे की कॉंग्रेस आता धर्मनिरपेक्ष पक्ष राहिलेला नाही. मुसलमानांच्या तक्रारी मांडण्यासाठी जनतेची चळवळ उभी करण्याचा त्यांनी इशारा दिला आहे. (*तेहेलका*, ८ नोव्हेंबर २००८, पृष्ठ ३) धर्माच्या आधारे सरकारी नोकरीत व उच्च शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण देण्यात यावे अशी मागणी आता जोर धरत आहे. रंगनाथ मिश्रा आयोगाचा अहवाल अद्याप संसदेच्या पटलावर ठेवण्यात आलेला नाही, परंतु सर्व सरकारी नोकऱ्या व उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये

**सरकारी नोकऱ्या, पोलिस व निमलष्करी दलांमध्ये मुसलमानांचे अत्यल्प प्रतिनिधित्त्व असणे ही त्यांची आणखी एक महत्त्वाची तक्रार आहे. बहुतेक सरकारी कार्यालयांत व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांत मुसलमान कर्मचाऱ्यांचे प्रमाण ५ टक्क्यांहूनही कमी आहे.**

अल्पसंख्यांकांसाठी १५ टक्के आरक्षण ठेवण्यात यावे व त्यातील १० टक्के जागा मुसलमानांसाठी राखीव असाव्यात अशी शिफारस या आयोगाने केल्याचे वृत्त आहे. विधानसभा व संसदेतील मुसलमानांचे प्रतिनिधित्त्व त्यांच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणाइतके (१३.४ टक्के) तरी असावे अशीही एक मागणी आहे. फाळणीपूर्व काळातील मुसलमानांच्या मागण्याही याच स्वरूपाच्या होत्या. यावरून राज्यघटनेतील तरतुदींमुळे प्रत्यक्ष परिस्थितीत काहीच फरक पडलेला दिसत नाही.

ख्रिस्ती धर्मीय अल्पसंख्याकांना, विशेषत: त्यांनी केलेल्या धर्मांतराच्या प्रयत्नांमुळे, अधिकाधिक विरोध व हिंसाचाराला सामोरे जावे लागत आहे. यामुळे अनेक चर्चच्या इमारतींचे नुकसान झाले तसेच अनेक धर्मगुरू व भिक्षुर्णींवर (नन) हल्ले करण्यात आले. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने ओरिसा सरकारला 'औदार्य दाखविण्याची' व 'धर्मनिरपेक्षतेच्या' दृष्टीकोनातून प्रार्थनास्थळांना नुकसानभरपाई न देण्याच्या धोरणाचा फेरविचार करण्याची विनंती केली आहे. (*इंडियन एक्स्प्रेस*, २३ ऑक्टोबर, २००८) गेल्या काही महिन्यांत केंद्रीय गृह मंत्रालयाला ओरिसा, कर्नाटक व केरळच्या सरकारांना विशेष सूचनापत्रे पाठवून ख्रिस्ती धर्मियांविरुद्धचा हिंसाचार थांबविण्यासाठी ठोस पावले उचलण्याची व राज्यांत शांतता व सुव्यवस्था राखण्याची आठवण करून द्यावी लागली. अर्थात या विशेष सूचनांकडे दुर्लक्ष केल्यास यापुढचे पाऊल म्हणजे कलम ३५६ खाली राष्ट्रपती राजवट लागू करण्याची केंद्र सरकारची तयारी असल्यासच या सूचनेचा गंभीरपणे विचार केला जाईल. राजकीय पक्षांचे लोकसभा व राज्यसभेतील सध्याचे संख्याबल पाहता, अशा कारवाईस पाठिंबा मिळवणे केन्द्र सरकारला कठीण जाईल यात शंकाच नाही.

**उत्तर प्रदेश सरकार मशिदीच्या रक्षणासाठी योग्य ती पावले उचलण्यास तयार नाही, याबाबतचा पुरेसा पुरावा उपलब्ध असतानाही केंद्र सरकारने मशिदीच्या रक्षणासाठी योग्य ती कारवाई केली नाही. मशिदीबरोबरच नरसिंहराव सरकारची धर्मनिरपेक्ष प्रतिमाही पूर्णपणे उध्वस्त झाली.**

**राष्ट्रीय सर्वसामान्य मताचा अभाव :**

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्यामुळे व त्यानंतर देशभर उसळलेल्या जातीय दंगलींनंतर धर्मनिरपेक्षतेसंबंधीचे मुद्दे प्रामुख्याने समोर आले. उत्तर प्रदेश सरकार मशिदीच्या रक्षणासाठी योग्य ती पावले उचलण्यास तयार नाही, याबाबतचा पुरेसा पुरावा उपलब्ध असतानाही केंद्र सरकारने मशिदीच्या रक्षणासाठी योग्य ती कारवाई केली नाही. मशिदीबरोबरच नरसिंहराव सरकारची धर्मनिरपेक्ष प्रतिमाही पूर्णपणे उध्वस्त झाली. ही प्रतिमा सुधारण्यासाठी २९ जुलै १९९३ रोजी राजकारण व धर्माची फारकत करणारी दोन विधेयके सरकारने संसदेत सादर केली. एका विधेयकान्वये राज्यघटनेत दुरुस्ती सुचविण्यात आली, तर दुसऱ्या विधेयकान्वये जनतेच्या प्रतिनिधित्वाच्या कायद्यात दुरुस्ती सुचविण्यात आली. ही विधेयके दाखल करण्यापूर्वी याबाबत जनतेत एकमत निर्माण करण्यासाठी कोणताच प्रयत्न करण्यात आला नव्हता. इतर कोणत्याच राजकीय पक्षाला याचे श्रेय मिळू नये अशी सरकारची इच्छा होती हे उघडच दिसते. अपेक्षेप्रमाणेच, दोन्ही विधेयकांना विरोधी पक्षांकडूनच नव्हे, तर प्रसिद्धी माध्यमे, विचारवंत व समाजातील अनेक घटकांकडून तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. अखेर हा प्रयत्न सोडून देण्यात आला.[2]

राज्यघटना तयार होत असतानाही अशा प्रकारचा एक प्रयत्न अपयशी ठरला होता, ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. ३ एप्रिल १९४८ रोजी अनंतशयनम अय्यंगार यांनी जातीयवादी पक्षांवर बंदी घालण्यात यावी असा प्रस्ताव घटनासमितीत (संसदीय) मांडला होता. श्री. इसाक सेठ यांचा एकमेव अपवाद वगळता, अखेर खालील प्रस्ताव जवळजवळ एकमताने मान्य झाला : 'लोकशाही योग्य रीतीने राबवली जाण्यासाठी व राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी भारतातून जातीयवादाचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. या सभेचे असे मत आहे की कोणतीही जातीय संघटना आपल्या घटनेनुसार वा पदाधिकाऱ्यांद्वारे अथवा अन्य संस्थांद्वारे आपल्या स्वेच्छाधिकारांचा वापर करून धर्म, वंश व जात यांच्या आधारे कोणाला प्रवेश नाकारीत असेल किंवा धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक उद्दिष्टांऐवजी इतर कार्यक्रम राबवीत असेल, तर अशा कार्यक्रमांना प्रतिबंध करण्यासाठी सर्व प्रकारची योग्य ती संसदीय व शासकीय कारवाई केली जावी.'[3] हा ठराव पास झाल्यानंतरच्या काळात सर्वच धर्मियांमध्ये कट्टरवाद वेगाने वाढत असतानाही व परिस्थिती अधिकच वाईट होत जात असली तरीही या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यासाठी कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही.

**न्यायालयाचे निर्णय :**

गेल्या काही वर्षांत उमेदवारांनी धर्माच्या आधारे मते मिळवण्यासाठी प्रचार केल्यामुळे अनेक निवडणूक याचिका दाखल करण्यात आल्या त्यावरून यातील मुद्यांचे महत्त्व लक्षात येईल. उदाहरणार्थ, सान्ताक्रूझ विधानसभा मतदारसंघाबाबतच्या निवडणुकी संदर्भातील याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'मोठ्या प्रमाणावरील लेखी व तोंडी पुराव्याच्या आधारे हिंदुत्त्व व हिंदुधर्म यांचा वापर प्रचारासाठी करण्यात आला होता याबाबत शंका घेण्यास जागा राहत नाही. फिर्यादीने प्रथम आपल्या म्हणजे हिंदू समाज व धर्माच्या आधारे प्रचार केला. शिवाय धर्म, जात व

जमातीच्या आधारे नागरिकांत, विशेषत: हिंदू व मुसलमान समाजात शत्रुत्त्व व द्वेषभावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.' यावर सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यात आले (*अभिराम सिंग वि. सी.डी. कोमाचेन व इतर*, १९९६, ३ एससीसी ६६५). १६ एप्रिल १९९६ रोजी तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने असा निर्देश दिला की ही केस पाच न्यायमूर्तींच्या मोठ्या खंडपीठापुढे 'शक्यतो लवकर ठेवण्यात यावी, म्हणजे या अपिलातून निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांना तातडीने व निश्चितपणे उत्तरे मिळतील.' दुर्दैवाने ही केस अद्याप प्रलंबित आहे.

*इब्राहिम सुलेमान सैत वि. एम. सी. मोहम्मद व अजून एक*, एआयआर १९८० एससी ३५४ या केसच्या संदर्भात न्यायालयाने म्हटले आहे, 'संपूर्ण भाषण वाचले असता त्याचा सूर जातीयवादी आहे हे नाकारता येत नाही, परंतु या देशात जातीयवादी पक्षांना राजकारणात उतरण्यास बंदी नाही. असे असल्याने, प्रस्तुतच्या निवडणूक प्रचाराच्या भाषणात मतदारांकडे मतांची याचना करताना कायद्यात उल्लेखिलेल्या प्रचाराच्या अयोग्य बाबींकडे कशा तऱ्हेने पहावे हे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती गजेंद्रगडकर यांनी *कुलतार सिंग वि. मुख्तियार सिंग* याबाबतच्या निर्णयात न्यायालयाच्या वतीने स्पष्ट केले आहे : 'या देशात निरनिराळ्या राजकीय व आर्थिक विचारसरणीचे अनेक (राजकीय) पक्ष आहेत हे सर्वश्रुत आहे, परंतु त्यांचे सभासदत्त्व विशेषत्त्वाने विशिष्ट जमाती अथवा धर्मापुरते मर्यादित आहे. जोपर्यंत अशा पक्षांच्या निर्मितीला कायद्याने प्रतिबंध केलेला नाही व त्यांना निवडणुकीसाठी व संसदीय जीवनात मान्यता दिलेली आहे, तोपर्यंत अशा पक्षांच्या उमेदवारांनी केलेल्या प्रचारामुळे, ते यशस्वी झाल्यास, अप्रत्यक्षरित्या त्यांची निवडणूक धर्म, वंश,जात, जमात किंवा भाषेच्या प्रभावाने झाली आहे हे लक्षात घ्यावे लागेल. पक्षांचे सभासदत्त्व प्रामुख्याने विशिष्ट धर्म अथवा जमातीवर आधारित असूनही त्या पक्षांना मान्यता असल्याने व त्याआधारे ते कार्यरत राहू शकत असल्याने, हा दोष टाळता येत नाही.'

**राज्यघटना अस्तित्वात आल्यापासून आपल्याकडे मुस्लिम लीग, अकाली दल, हिंदू महासभा असे पक्ष आहेत. अकाली दलासारखे काही पक्ष राज्यांमध्ये सत्तेतही आले आहेत आणि तरीही अशा पक्षाचे नाव किंवा त्यांची एखाद्या धर्माशी असलेली जवळीक या कारणाने आतापर्यंत ते सरकार बरखास्त करण्याचा कोणी विचारही केला नाही.**

वरीलप्रमाणे परिस्थिती असूनही, हिंदू धर्म व हिंदुत्व यातील सूक्ष्म फरकाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाने काही निवडणूक याचिका फेटाळल्याने प्रश्न निर्माण झाले आहेत. *मनोहर जोशी वि. नितिन भाऊराव पाटील व एकजण*, एआयआर १९९६ एससी ७९६, या केसमध्ये न्यायालयाने म्हटले आहे : 'हिंदुत्व' या शब्दाचा अर्थ दरवेळी हिंदू धर्म असाच होतो असे नाही, परंतु एखाद्या ठिकाणी संदर्भ व त्याचा वापर कशा तऱ्हेने केला गेला आहे हे 'हिंदुत्व' याचा अर्थ ठरवण्यासाठी महत्त्वाचे असते. संदर्भ नसताना दरवेळी 'हिंदुत्व' याचा अर्थ हिंदू धर्म असाच होतो असे म्हणता येत नाही.' *डॉ. रमेश यशवंत प्रभू वि. प्रभाकर काशिनाथ कुंटे*, एआयआर १९९६ एससी १११३, यात न्यायालयाने म्हटले आहे : 'हिंदू', 'हिंदुत्व' 'हिंदुइझम' या शब्दांचा निश्चित अर्थ सांगता येत नाही; संदर्भाशिवाय भारतीय संस्कृती व वारसा यांच्या व्यतिरिक्त याचा अर्थ केवळ हिंदू धर्मापुरता मर्यादित मानता येत नाही. 'हिंदुत्व' याचा अर्थ आपल्या उपखंडातील लोकांच्या जीवनपद्धतीशी निगडीत आहे. संदर्भाखेरीज 'हिंदुत्व' आणि 'हिंदुइझम' यांचा अर्थ व त्याची बरोबरी कट्टर हिंदुधर्मीयांचा हटवादीपणा असा होतो असे मानणे, किंवा याचा समावेश निवडणूक कायद्याच्या कलम १२३ उपकलम (३) व/किंवा (३अ) खालील प्रतिबंधात होतो असे म्हणणे कठीण आहे. *सामान्यपणे 'हिंदुत्व' म्हणजे जीवनपद्धती किंवा मानसिकता असे समजता येईल आणि त्याचा अर्थ हिंदू धार्मिक कट्टरता असे मानण्याचे कारण नाही. 'हिंदुत्व' हा शब्द भारतीयत्व, म्हणजे देशात एकत्रितपणे नांदणाऱ्या निरनिराळ्या संस्कृतींमधील फरक दूर करून एका समान संकृतीची निर्मिती, या अर्थाने वापरला जातो.* हिंदुइझम किंवा हिंदुत्व या शब्दांद्वारे इतर धर्मियांविषयी विरोध, शत्रुत्व अथवा असहिष्णुता दर्शविणे किंवा जातीयतेचा पुरस्कार केला जातो असे म्हणणे हा शब्दांचा अर्थ नीटपणे न समजून घेण्याचा परिपाक आहे असे म्हणावे लागेल.'

अर्थात हे तात्विक विवेचन निवडणुकीच्या तापलेल्या वातावरणात फारसे प्रभावी ठरत नाही हे निराळे सांगायला नको. मुसलमान व इतर अल्पसंख्याक समाजातील लोकांना वरील स्पष्टीकरण पटणार नाही व ते त्याचा स्वीकारही करणार नाहीत. वास्तविक पाहता, देशाची फाळणी 'दोन देशां'च्या ज्या तत्त्वाने करण्यात आली त्याच्या हे विरुद्धच आहे. आपली धार्मिक व सांस्कृतिक ओळख पुसली जाईल अशी भीती यामुळे देशातील अल्पसंख्याकांच्या मनात निर्माण होईल. 'महाराष्ट्रात देशातील पहिले हिंदू राज्य स्थापन होईल असे म्हणण्याने धर्माच्या आधारे मते मागितली जात आहेत असे म्हणता येत नाही, यातून फार तर एक आशा व्यक्त केली जात आहे,' या न्यायालयाच्या विधानामागील तर्कशास्त्र समजणेही कठीण आहे. या सर्व निवडणूक याचिका शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांच्या भाषणांवर आधारित होत्या व हिंदू धर्माचा प्रसार करणे हा या पक्षांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा भाग असल्याने या प्रश्नाला अधिक महत्त्व प्राप्त होते. सर्वोच्च न्यायालयाचे हे निकाल ज्या तत्त्वांवर आधारलेले आहेत आणि ज्यांचा धर्मनिरपेक्षतेशी महत्त्वाचा संबंध आहे, त्या तत्त्वांचा सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या घटनापीठाने अद्याप पुनर्विचार केलेला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या *एस. आर. बोम्मई वि. भारत सरकार*, एआयआर १९९४ एससी २०९२, या खटल्यातील

निकालाचा उल्लेख करणे योग्य ठरेल. १९९२ साली भारत सरकारने मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश व राजस्थान सरकारे बरखास्त करण्याच्या संदर्भातील खटल्यात न्यायमूर्ती सावंत व न्यायमूर्ती कुलदीप सिंग यांनी निकालपत्रात लिहिले की : 'धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याचा भाग आहे. भारतातील सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्य मिळालेले असले तरी सरकारच्या दृष्टीने एखाद्या व्यक्तीचा धर्म किंवा धर्मावरील विश्वास महत्त्वाचा नाही. शासनासमोर सर्व समान असून त्यांना समान वागणूक देणे अपेक्षित आहे. शासनाच्या कारभारात धर्माला स्थान असता कामा नाही. *कोणताही राजकीय पक्ष एकाच वेळी धार्मिक पक्षही असू शकत नाही. राजकारण व धर्माची सरमिसळ होता कामा नये. एखाद्या राज्यसरकारने धार्मिक धोरणांचा पाठपुरावा केल्यास किंवा धार्मिक स्वरूपाची कारवाई केल्यास ते राज्यघटनेने निर्धारित केलेल्या उद्दिष्टांचे उल्लंघन होऊन त्याच्यावर कलम ३५६ अन्वये कारवाई होऊ शकेल.'* निकालाच्या या भागाला कोणाही इतर न्यायमूर्तींनी विरोध, आक्षेप नोंदविला नाही अथवा अन्य पुस्ती जोडली नाही. 'ही विधाने जरा अधिकच विस्तारित स्वरूपात (ओव्हर ब्रॉडली स्टेटेड) करण्यात आली आहेत', हे सोली सोराबजींचे म्हणणे योग्यच आहे. (जर्नल सेक्शन (१९९४) ३ एससीसी, पृष्ठ ३०) या निकालावरील परिपूर्ण लेखात सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एच.आर. खन्ना म्हणतात : 'या तीन राज्यांच्या संदर्भातील न्यायालयाच्या निकालाचा भारतीय जनता पक्ष कोणत्याही राज्यात सरकार बनविण्यावर व ती सरकारे टिकण्यावर गंभीर परिणाम होईल. तसेच कोणत्याही राज्यात भाजपची सरकारे स्थापन झाल्यास ती बरखास्त करावी लागतील. तरीही राज्यघटना अस्तित्वात आल्यापासून आपल्याकडे मुस्लिम लीग, अकाली दल, हिंदू महासभा असे पक्ष आहेत. अकाली दलासारखे काही पक्ष राज्यांमध्ये सत्तेतही आले आहेत आणि तरीही अशा पक्षाचे नाव किंवा त्यांची एखाद्या धर्माशी असलेली जवळीक या कारणाने आतापर्यंत ते सरकार बरखास्त करण्याचा कोणी विचारही केला नाही. सर्वोच्च न्यायालयाने देशातील राजकीय वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही व तसे करूही नये असे प्रस्तुत लेखकाचे म्हणणे आहे. तर्कशास्त्र हा कायद्याचा आधार नसून, अनुभव हा आहे असे म्हटले जाते; त्याचबरोबर राजकीय व सामाजिक अस्तित्वाचे योग्य ते भानही कायद्याला ठेवावे लागेल. राज्यघटना पोकळीत कार्यरत राहू शकत नाही किंवा राजकीय व सामाजिक परिस्थितीच्या बाहेर एखाद्या मनोऱ्यातही राहू शकत नाही.'[४]

**राज्यघटना धर्म स्वीकारण्याचे, तो पाळण्याचे व त्याचा *प्रसार करण्याचे* स्वातंत्र्य देते. घटनासभेतील चर्चेच्या वेळी काही अल्पसंख्याकांनी असा दावा केला होता की त्यांच्या धर्माप्रमाणे, धर्माचा प्रसार करणे हे त्यांच्यावर बंधनकारक आहे आणि हे स्वातंत्र्य त्यांना मिळायला हवे. राज्यघटना तयार करताना या तरतूदीमागील कारणे काहीही असली तरी, आजवरचा अनुभव जमेस धरता, या तरतुदीचा आता फेरविचार करणे अगत्याचे ठरते.**

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांद्वारे धर्मनिरपेक्षतेच्या बाबत परस्परविरोधी संदेश मिळतात. २००५ सालच्या एका निकालात न्यायालयाने म्हटले आहे की गृहनिर्माण संस्था वेगळ्या धर्माच्या अथवा जमातीच्या लोकांना सभासद करून घेण्याचे नाकारू शकतात किंवा आपले सभासदत्त्व एखाद्या विशिष्ट जाती अथवा जमातीपुरतेच मर्यादित ठेवण्यासाठी उपनियम बनवू शकतात. 'द लॉयर्स कलेक्टिव्ह'ने आपल्या संपादकीयात म्हटले आहे, 'या निकालाचे परिणाम भयावह होतील. धार्मिक गटांसाठी तर ते अधिकच भयप्रद असतील.'[५] गृहनिर्माण व शैक्षणिक संस्था यांत वेगळेपणाची वागणूक मिळण्याचा धार्मिक गटांवर व जमातींवर खोलवर परिणाम होतो व त्यामुळे अशा गटात दूरत्वाची भावना वाढीस लागते हे सर्वश्रुतच आहे. सामाजिक अस्वस्थता, जातीय दंगली यामागचे हेही एक महत्त्वाचे कारण आहे. अशा जमातींच्या केवळ निम्नस्तरांपुरतेच हे विलगीकरण मर्यादित आहे असे नाही. मुंबई, पुणे, बंगळुरूसारख्या महानगरांत श्रीमंत व प्रसिद्ध मुसलमान व्यक्तींना देखील योग्य ती घरे मिळण्यास अडचणी येतात असे वेळोवेळी वृत्तपत्रांत येणाऱ्या बातम्यांतून दिसून येते. शबाना आझमींनी असा दावा केला आहे की त्या व त्यांचे पती जावेद अख्तर यांना ते मुसलमान असल्याने मुंबईत सदनिका मिळू शकली नाही. सैफ अली खान या मुसलमान अभिनेत्यालाही अशाच समस्येला तोंड द्यावे लागले असेही त्या म्हणतात. (*आउटलुक*, २२ सप्टेंबर २००८, पृष्ठ ८८) पुण्यात एका सधन वस्तीतील गृहनिर्माण संस्थेने आपल्या एका सदस्याला त्याची सदनिका मुसलमान व्यक्तीला विकण्यास मज्जाव केला. १९९३ सालच्या मुंबईतील दंगलीच्या काळात काही जातीय पक्षांचे सदस्य अनेक इमारतीत जाऊन तेथील मुसलमान रहिवासी शोधून त्यांच्यावर हल्ले करीत होते.

वाळीत टाकण्यास प्रतिबंध करणाऱ्या तत्कालीन मुंबई प्रांताच्या १९४९च्या कायद्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निकालही असाच अस्वस्थ करणारा आहे. या कायद्यात तरतूद होती की, 'इतर कोणत्याही कायद्यात काहीही म्हटले असले तरी, किंवा देशात याविरुद्ध कोणतीही प्रथा अथवा पद्धती प्रचलित असली, तरीही कोणत्याही जमातीच्या कोणालाही वाळीत टाकता येणार नाही व ते वैध ठरणार नाही.' दाऊदी बोहरा जमातीच्या प्रमुखाने या कायद्याला आव्हान दिले. मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली, परंतु सर्वोच्च न्यायालयाने (*सरदार सय्यदना ताहेर सैफुद्दिन साहेब वि. मुंबई सरकार*, एआयआर १९६२ एससी ८५३), राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला धर्म व विश्वास याबाबत स्वातंत्र्य बहाल केले असले तरीही बहुमताने हा कायदा अवैध ठरवला.[६]

सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती सिन्हा यांनी आपल्या विरोधी निकालपत्रात म्हटले आहे की 'एखाद्याला जातिभ्रष्ट ठरवून त्याच्या आत्मसन्मानाला हानी पोचवण्याचा व आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीला स्मरून त्याप्रमाणे वागण्याचे त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा खोडसाळपणा थांबविण्यासाठीच हा कायदा करण्यात आला आहे. राज्यघटनेच्या कलम २५(१) नुसार मिळालेले धर्मस्वातंत्र्य अबाधित राखणे यासाठी हा कायदा करण्यात आला आहे, त्या स्वातंत्र्यावर गदा आणण्यासाठी नव्हे.' सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांनीही म्हटले आहे की मुंबई न्यायालयाचा हा निकाल प्रगतीशील मानला गेला होता, पण दुर्दैवाने, सर्वोच्च न्यायालयाने तो रद्दबातल ठरविल्याने त्याला धक्का बसला. अगोदर अपेक्षिल्याप्रमाणे ते जर या खंडपीठावर असते, तर मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल अबाधित राखण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केला असता.[७] आतापर्यंत या निकालाला कोणी आव्हान दिले नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

**धर्मप्रसार :**

राज्यघटना धर्म स्वीकारण्याचे, तो पाळण्याचे व त्याचा *प्रसार करण्याचे* स्वातंत्र्य देते. घटनासभेतील चर्चेच्या वेळी काही अल्पसंख्याकांनी असा दावा केला होता की त्यांच्या धर्माप्रमाणे, धर्माचा प्रसार करणे हे त्यांच्यावर बंधनकारक आहे आणि हे स्वातंत्र्य त्यांना मिळायला हवे. राज्यघटना तयार करताना या तरतूदीमागील कारणे काहीही असली तरी, आजवरचा अनुभव जमेस धरता, या तरतुदीचा आता फेरविचार करणे अगत्याचे ठरते. जवाहरलाल नेहरूंनी ५ ऑगस्ट १९५४ रोजी प्रदेश कॉंग्रेस समित्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले होते : 'आपली राज्यघटना धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर आधारित असून सर्वांना धर्मस्वातंत्र्य तर आहेच, पण धर्मांतर करवण्याचे देखील स्वातंत्र्य दिलेले आहे. मोठ्या प्रमाणावरील धर्मांतराचे प्रयत्न मला व्यक्तिश: मान्य नाहीत. परंतु हे माझे वैयक्तिक मत आहे, आणि ते इतरांवर लादण्याचा मला अधिकार नाही. काही विशेष विचारांमुळे एखाद्याने धर्म बदलावा हे समजण्यासारखे आहे. परंतु मोठ्या प्रमाणावरील धर्मांतरात एखाद्याच्या वैयक्तिक विश्वासाचा प्रश्नच येत नाही व त्यामागे बहुतेक वेळा एखादी राजकीय गरजच असते.'[८]

अनुसूचित जाती व जमाती तसेच समाजातील गरीब घटकांचे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेले धर्मांतर हे जातीय तणाव व हिंसाचार यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. हे कर्नाटक, ओरिसा, केरळ व मध्य प्रदेशातील अलीकडील घटनांत दिसून आले. प्रत्येक धर्मातील जनतेची जातीनिहाय वर्गवारी केल्यास, इतर धर्मांशी तुलना केली असता ख्रिस्ती धर्मातील ही आकडेवारी विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. ९ टक्के ख्रिस्ती अनुसूचित जातींचे, ३२.८ टक्के अनुसूचित जमातींचे, २४.८ टक्के इतर मागासवर्गीय (ओबीसी) व ३३.३ टक्के 'इतर' आहेत. म्हणजे सुमारे ६७ टक्के ख्रिस्ती लोकसंख्या ही अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांची आहे. हिंदुंमधील हीच टक्केवारी ७४ टक्के आहे. मुसलमानांमधील सर्वात अधिक लोक इतर मागासवर्गीयांमधील (३९.२ टक्के) आहेत.[९] बौद्ध धर्मातही अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावरील धर्मांतरे झाली असली, तरी हिंदुंमध्ये व विशेषत: कट्टर हिदुत्त्ववाद्यांमध्ये याबाबत विशेष तीव्र प्रतिक्रिया उमटली नाही. कारण जनमानसात बौद्ध धर्म हा हिंदू धर्माचा एक पंथ मानला जातो. हिंदूंच्या इतर धर्मांत होणाऱ्या धर्मांतरांचे व्यापक परिणाम व विशेषत्त्वाने सामाजिक सुसूत्रता व सामाजिक सुव्यवस्थेवरील त्यांच्या परिणामांचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. विशेष महत्त्वाचे म्हणजे, धार्मिक संस्थांना आर्थिक व इतर स्वरूपाची लालुच दाखवूनही धर्मांतर करवण्याचे अनिर्बंध स्वातंत्र्य बहाल केल्याने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वालाच हिंदुंकडून आक्षेप घेतला जाऊ लागला आहे.

मध्यप्रदेश व ओरिसा राज्यांनी प्रस्तावित केलेल्या कायद्याच्या संदर्भात धर्मांतरासंबंधीच्या प्रश्नाचा सर्वोच्च न्यायालयाने १९७७ सालीच सखोल आढावा घेतला होता. (*रेव्ह. स्टेनिस्लॉस वि. मध्यप्रदेश सरकार व इतर; ओरिसा सरकार व इतर वि. श्रीमती युलिता हाइड व इतर वगैरे*, एआयआर १९७७ एससी ९०८.) न्यायालयाने म्हटले होते : 'कलम २५(१) अन्वये एखाद्याला धर्मांतर करवण्याचा अधिकार मिळतो असे नाही. कलम २५(१) नुसार प्रत्येक नागरिकाला 'धर्मस्वातंत्र्य' बहाल केले आहे, केवळ कोणत्याही एका धर्माच्या अनुयायांना ते दिलेले नाही. म्हणजेच दुसऱ्या व्यक्तीला धर्मांतर करून आपला धर्म स्वीकारावयास लावण्याचा कोणालाही मूलभूत अधिकार दिलेला नाही. एखाद्या व्यक्तीने हेतुपूर्वक दुसऱ्या व्यक्तीचे धर्मांतर करवणे व आपल्या धर्माच्या तत्त्वांचा प्रसार करणे यात फरक आहे व देशाच्या नागरिकांना मिळालेल्या 'धर्मस्वातंत्र्या'चा याद्वारे अधिक्षेप होतो.' न्यायालयाने असेही म्हटले आहे की, एखाद्या गोष्टीने 'समाजजीवनाचा प्रवाह खंडीत होत असेल व केवळ एकाच व्यक्तीपुरता याचा प्रभाव मर्यादित नसेल, तर त्याने सुव्यवस्थेला बाधा आली असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, एखाद्याचे सक्तीने धर्मांतर करवले गेल्याने, जातीय भावना प्रक्षुब्ध करण्याचा प्रयत्न केला गेल्यास, सामाजिक सुव्यवस्था धोक्यात येण्याची परिस्थिती उद्‌भवू शकेल व त्याचा संपूर्ण समाजावर परिणाम होईल. (मध्यप्रदेश व ओरिसाच्या) या दोन कायद्यांत धर्माचे नियंत्रण करण्याची तरतूद नाही.' म्हणून न्यायालयाने जबरदस्तीने, खोटेपणाने, लालूच दाखवून वगैरे धर्मांतर करवण्यास

**मतपेटीचे राजकारण हा धर्मनिरपेक्षतेच्या मार्गातील एक मोठा अडसर झाला आहे. हा धोका टाळण्याचा एक जालीम उपाय म्हणजे निवडणुकीत विजयी होण्यासाठी उमेदवाराला ५० टक्के अधिक एक इतकी तरी मते मिळणे आवश्यक आहे असा कायदा करणे.**

प्रतिबंध करणारे हे दोन्ही कायदे वैध ठरविले. हे अधिकृत मत उपलब्ध असूनही केंद्र सरकारने नि:संदिग्ध भूमिका घेऊन याविषयी स्पष्ट धोरण आखून दिले नाही. त्यामुळे धार्मिक अल्पसंख्याकांना व विशेषत: ख्रिस्ती लोकांना नाराज करण्याची केंद्र सरकारची इच्छा नाही अशी भावना जनतेत बळावली. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे गेल्या काही वर्षांत मुसलमानांनी मोठ्या प्रमाणावर धर्मांतरे घडवून आणली नाहीत. कलम २५ हे राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याचा भाग असल्याने, संसदेला त्यात दुरुस्ती करून ‘प्रसार’ हा शब्द काढून टाकता येणार नाही, परंतु, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देऊन सरकार याबाबत योग्य असे मार्गदर्शक धोरण जाहीर करू शकेल. याने कटुपणा आणणारे व सामाजिक सुव्यवस्था धोक्यात आणणारे एक महत्त्वाचे कारण नाहीसे होईल व बहुसंख्य समाजाचा धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावरील विश्वासही दृढ होईल. ख्रिस्ती मिशनऱ्यांना परदेशातून बराच पैसा मिळत असल्याने, परदेशी देणग्या (नियंत्रण) कायद्याचा (एफसीआरए) परिणामकारक वापर करून धर्मांतरांसाठीच्या गैरवापरावर बंधन आणता आले असते. दुर्दैवाने, ज्या हेतूने व मूळ उद्देशांसाठी हा कायदा करण्यात आला होता, त्याचा विचारच मागे पडला आहे. त्याऐवजी विकासाच्या अनेकविध क्षेत्रात लक्षणीय कार्य करणाऱ्या बिगर सरकारी संस्थांना त्रास देण्यासाठीच या कायद्याचा वापर केला जात आहे.

**नरसिंह राव सरकारने ‘टाडा’ कायदा (टेररिस्ट अँड डिसरप्टिव्ह ॲक्टिव्हिटिज प्रिव्हेंशन ॲक्ट) मुसलमानांवर अन्याय होतो या कारणासाठी रद्दबातल होऊ दिला. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारने ते सत्तेवर आल्याबरोबर ‘पोटा’ कायदा (प्रिव्हेन्शन ऑफ टेररिझम ॲक्ट) रद्द केला.**

**निवडणुका अधिक प्रातिनिधीक करणे :**

मतपेटीचे राजकारण हा धर्मनिरपेक्षतेच्या मार्गातील एक मोठा अडसर झाला आहे. हा धोका टाळण्याचा एक जालीम उपाय म्हणजे निवडणुकीत विजयी होण्यासाठी उमेदवाराला ५० टक्के अधिक एक इतकी तरी मते मिळणे आवश्यक आहे असा कायदा करणे. सध्याच्या सर्वाधिक मते मिळविणारा उमेदवार (फर्स्ट पास्ट द पोस्ट सिस्टिम) विजयी ठरविण्याच्या पद्धतीमुळे बरेचसे आमदार अल्पसंख्य मतांवर निवडून येतात. प्रस्तावित बदलामुळे लोकशाही अधिक प्रातिनिधिक बनेल व उमेदवारांना त्यांच्या मतदारसंघातील सर्व घटकांचा पाठिंबा मिळवावा लागेल आणि केवळ जात, जमात किंवा धर्माच्या आधारे मते मागून आणि मिळवून भागणार नाही.

**वेगळेपणाच्या अस्वस्थ भावनेचे प्रकटीकरण :**

धर्मनिरपेक्षतेवरील विश्वास उडून जाण्यामुळे मुसलमान व हिंदू (१९९०च्या दशकात शीख देखील) आतंकवादाकडे वळू लागले ही भयावह घटना आहे. अतिरेकी कारवायात भाग घेणाऱ्या बऱ्याच व्यक्ती उच्चशिक्षित आणि आतंकवादाने प्रेरित झालेल्या आहेत ही बाब धक्कादायक आहे. सर्वच धार्मिक गटांना आपण वेगळे पडलो आहोत असे वाटणारा (एलियनेटेड) हा एकमेव देश असावा! अगदी अलीकडेपर्यंत सर्व अतिरेकी कारवाया नेहमी पाकिस्तानातील आयएसआय (इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स) या संघटनेने व बंगलादेशातील अतिरेकी संघटनांनी घडवून आणल्या असे मानले जात असे. त्यानंतर मात्र आतंकवादाची पाळेमुळे देशातही असून मुसलमान यासाठी अधिक जबाबदार होते असे दिसून आले. आता हिंदुंचाही यात सहभाग असल्याचे दिसून आले आहे. इतकेच नव्हे, तर काही हिंदु धार्मिक नेतेही यात पुढाकार घेत असून अतिरेकी कारवाया घडवून आणत आहेत असे आढळले आहे. भारताचे सैन्यदल हे देशाच्या धर्मनिरपेक्ष संस्कृतीचे प्रतीक मानले जात असे, पण आता प्रत्यक्ष सेवेत असलेले काही अधिकारी व काही निवृत्त अधिकारी यांचा यात सहभाग असल्याचे दिसून आल्यापासून जातीयतेचे विष व धर्मनिरपेक्षतेवरील अविश्वास कोणत्या थराला पोचला आहे याची कल्पना येते. हा एक अपवाद आहे असे समजून याकडे दुर्लक्ष करणे धोक्याचे ठरेल. देशाचे ऐक्य, एकता व अस्तित्त्वावर याचा होणारा परिणाम भयावह असून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. हिंदू आतंकवादाकडे काँग्रेस व संयुक्त पुरोगामी आघाडीने नको तेवढे अधिक लक्ष दिल्यास देशात यादवी युद्ध होईल असा इशारा देण्यापर्यंत भाजपचे अध्यक्ष राजनाथ सिंग यांनी मजल मारली आहे. त्याचप्रमाणे या प्रश्नाकडे केवळ शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न या संकुचित दृष्टीने पाहणे देखील चुकीचे ठरेल. वेगळे पडले असल्याची, अन्याय झाला असल्याची व भेदभावाची भावना याच्या मुळाशी असणाऱ्या कारणांकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

युद्ध ही केवळ सेनापतींवर सोडून देण्यासारखी साधी बाब नाही असे म्हटले जाते. शासनाविषयी देखील असेच म्हणता येईल. राज्यघटनेच्या मूलभूत ढाच्याचा भाग असणाऱ्या धर्मनिरपेक्षतेसारख्या महत्त्वाच्या तरतुदीच्या संदर्भात ही बाब केवळ राजकारणी व नोकरशहा यांच्यावर सोडून चालणार नाही. ऑक्टोबर २००८ मध्ये झालेल्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेत झालेल्या चर्चेच्या गुऱ्हाळाच्या निमित्ताने ही बाब परत एकदा अधोरेखित केली गेली. या परिषदेसाठी सरकारने तयार केलेल्या, पार्श्वभूमीबाबतच्या नोटमध्ये राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या १९६८ साली पारित केलेल्या उद्दिष्टांच्या घोषणेचा पुनरुच्चार करण्याखेरीज या महत्त्वाच्या विषयांसंबंधी काहीच म्हटले नव्हते! शासनाच्या विचारांच्या दारिद्र्याचे याहून अधिक बोलके उदाहरण ते काय असणार.

**धर्मनिरपेक्षता आयोगाची स्थापना – तातडीची गरज :**

राज्यघटनेत नमूद केलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या उद्दिष्टाची जपवणूक केली जावी आणि या उद्दिष्टावरील जनतेचा विश्वास पुनर्स्थापित व्हावा यासाठी एका धर्मनिरपेक्षता आयोगाची स्थापना करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. प्रस्तुत लेखकाने *द होलोकॉस्ट ऑफ इंडियन पार्टिशन– ॲन इन्क्वेस्ट*[१०] *(फाळणीचे हत्याकांड – एक उत्तरचिकित्सा)* या आपल्या ग्रंथात फाळणीकडे मागे वळून पाहतांना भावी काळासाठी समर्पक धड्यांची चर्चा करताना ही कल्पना मांडली आहे. असा आयोग परिणामकारक ठरण्यासाठी राज्यघटनेत दुरुस्ती करून या आयोगाची स्थापना करण्यात यावी व तिचे अध्यक्षपद भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायमूर्तींकडे असावे. इतर पाच सदस्य हे प्रसिद्ध विधिवेत्ते, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती, उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमूर्ती व सार्वजनिक जीवनातील काही नामवंत आणि सचोटीच्या व्यक्तींमधून निवडलेले असावेत. असा आयोग धर्मनिरपेक्षतेशी संबंधित बाबींकडे साकल्याने पाहू शकेल व उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयांसमोर येणाऱ्या बाबींतही आपली बाजू मांडू शकेल (इंटरव्हीन). या बाबतीतील राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या स्तुत्य कार्याचा उल्लेख करणे प्रस्तुत ठरेल. गोध्रा हत्याकांडासंबंधीच्या सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात या आयोगाने महत्त्वपूर्ण भाग घेतल्यापासून त्याचा नैतिक अधिकार सर्वमान्य झाला आहे. नैतिक अधिकारवाणीने बोलू शकतील व ज्यांच्याविषयी समाजातील सर्व थरांना आदर वाटतो असे राष्ट्रीय पातळीवरील विश्वासार्ह नेते उपलब्ध नसल्याने, धर्मनिरपेक्षता आयोग ही पोकळी भरून काढण्यासाठी आदर्श तोडगा ठरू शकेल. असा आयोग समाजात धर्मनिरपेक्षतेसंबंधी जनमत तयार करू शकेल. त्यांच्यापुढील सार्वजनिक सुनावणीद्वारे सर्व राजकीय पक्षांना, विचारवंतांना, धार्मिक नेत्यांना व जागरुक नागरिकांना आपली मते मोकळेपणे व स्पष्टपणे मांडता येतील. राज्यघटनेत नमूद केलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या मूलभूत तत्त्वाला अशा प्रकारेच प्रत्यक्षात उतरवता येईल.

राजकीय पक्ष, सार्वजनिक संस्था, केंद्र व राज्य सरकारे, प्रसिद्धी माध्यमे व इतर यांच्या घोषणा, कृती व कार्यक्रम यांच्याद्वारे धर्मनिरपेक्षतेवर विपरीत परिणाम होणार असेल, तर त्यावर निर्णय देण्याची जबाबदारी या आयोगावर असेल. अशा घटनांची दखल आयोग आपण होऊन घेऊ शकेल किंवा व्यक्ती अथवा संस्था यासंबंधी अर्ज दाखल करू शकतील. आयोगाचा निर्णय सर्वावर बंधनकारक असेल, केवळ सर्वोच्च न्यायालय या निर्णयात दुरुस्ती करू शकेल अथवा तो रद्दबातल ठरवू शकेल. अशा प्रकारे धर्मनिरपेक्षता आयोगाचे अधिकार राष्ट्रीय मानवी हक्क आयोगापेक्षा अधिक व्यापक असतील. मानवी हक्क आयोगाचे निर्णय सरकारवर बंधनकारक नसतात. न्यायालयाने काय निर्णय दिला हे लक्षात न घेता, बऱ्याच वेळा हिंसक ठरलेली गोहत्याबंदीची चळवळ ही बाब उच्च न्यायालयात व नंतर सर्वोच्च न्यायालयात गेल्यावरच थंड झाली हे या संदर्भात आठवण करून देण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे अत्यंत ज्वलंत व स्फोटक ध्येय–धोरणे, धर्मनिरपेक्षतेबाबतचा राज्यघटनेतील महादेश (मँडेट) प्रत्यक्षात आणण्यासाठी, त्यातील राजकारण बाजूला ठेवून धर्मनिरपेक्षता आयोगासारख्या संविधानिक व्यवस्थेकडे सोपवणेच योग्य ठरेल. तुर्कस्थानमध्ये २००७ साली, सत्तेत असलेल्या जस्टिस अँड डेव्हलपमेंट (एकेपी) पक्षावर, त्या देशाच्या घटनाविषयक न्यायालयात राज्यघटनेविरोधी असणाऱ्या, धर्मनिरपेक्षतेच्या विरोधी काही कारवायांबाबत बंदी आणण्यासाठी खटला चालवण्यात आला होता. त्या शासनाला आपल्या अस्तित्त्वासाठी निकराचा लढा द्यावा लागला होता याची आठवण करून देणेही उचित ठरेल.

सर्वदूर परिणाम करणाऱ्या अशा प्रकारच्या राजकीय सुधारणा तातडीने करण्यासाठी आवश्यक ती मुत्सद्देगिरी व राजकीय इच्छाशक्ती आपल्याकडे आहे का हाच खरा प्रश्न आहे. केवळ जनमताच्या रेट्याच्या दडपणामुळेच राजकीय पक्षांना अशी कारवाई करण्यास भाग पाडता येईल. राजकीय पक्षांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्यांत, २००९ साली नवी लोकसभा अस्तित्त्वात आल्यावर, असा आयोग स्थापन करण्यासाठी आवश्यक ती घटनादुरुस्ती करण्याचे वचन द्यावे यासाठी एक देशव्यापी चळवळ उभारावी लागेल.

**– माधव गोडबोले**

'सांगाती', ७३/२/२, भक्तिमार्ग, एरंडवणा, पुणे ४११००४.

दूरध्वनी : ०२०–२५४६५१८२.

(लेखक निवृत्त केंद्रीय गृहसचिव आहेत.)

**तळटीपा :**

१. न्यायमूर्ती व्ही. डी. तुळजापुरकर, युनिफॉर्म सिव्हिल कोड, एआयआर (जर्नल), १९८७, पृष्ठे १७–१८.

२. सुभाष सी.कश्यप, *डीलिंकिंग रिलिजन अँड पॉलिटिक्स*, विमोत पब्लिशर्स, नवी दिल्ली, १९९३, पृष्ठे ५१–६३.

३. वरीलप्रमाणे, पृष्ठे ८४–१३६.

४. न्यायमूर्ती एच.आर. खन्ना, सुप्रीम कोर्ट जजमेंट ऑन आर्टिकल ३५६, *एआयआर (जर्नल)* १९९४.

५. ॲपरथाइड, बाय एनी अदर नेम, *द लॉयर्स कलेक्टिव्ह*, एप्रिल २००५.

६. न्यायमूर्ती सी.एस. धर्माधिकारी, क्रिमिनल जस्टिस सिस्टीम अँड ट्राइब्ज इन इंडिया, *एआयआर (जर्नल)* १९८८.

७. न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर, *टु द बेस्ट ऑफ माय मेमरी*, भारतीय विद्या भवन, मुंबई, १९८२, पृष्ठ १४८.

८. जवाहरलाल नेहरू पेपर्स, नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी, नवी दिल्ली, '*मुस्लिम इंडिया*' यात उधृत केलेले, ऑगस्ट २००८, पृष्ठ १२.

९. *सच्चर कमिटी रिपोर्ट ऑन सोशल, इकॉनॉमिक अँड एज्युकेशनल स्टेटस ऑफ मुस्लिम कम्युनिटी ऑफ इंडिया*, २००८, तक्ता १.२.

१०. माधव गोडबोले, *द होलोकॉस्ट ऑफ इंडियन पार्टिशन– ॲन इन्क्वेस्ट*, रुपा अँड कंपनी, नवी दिल्ली, २००६, पृष्ठ ५४३,
अनुवाद सुजाता गोडबोले, *फाळणीचे हत्याकांड – एक उत्तरचिकित्सा*, राजहंस प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठे ४५३–४५४.





लक्ष्मीकांत देशमुख

# बखरीचे स्वरूप

## ।। अध्याय पहिला ।।

**सर्जनशील मराठी लेखक आणि उत्तम प्रशासक अशी दुहेरी ओळख असलेले लक्ष्मीकांत देशमुख (सध्या महाराष्ट्राचे क्रीडा संचालक), 'बखर : भारतीय प्रशासनाची' ही लेखमाला साधनासाठी लिहिणार आहेत, ती पुढील वर्षभर महिन्यातून दोन वेळा प्रसिद्ध होईल.**

ही बखर आहे भारतीय प्रशासनाची, ज्याला स्वातंत्र्योत्तर काळात सर्वाधिक दूषणे दिली गेली आहेत. इंग्रजी भाषेतील 'ए टू झेड' शब्दांनी प्रशासनाची बदनामी वर्णिता येईल. Arrogant (उद्धट), Cold (थंड), Doscourtius (सौजन्याचा अभाव), Inefficient (अक्षम), Negative (नकारार्थी), Opperessive (दडपशाही करणारे), Rude (असंस्कृत) इ.

भारतीय प्रशासनात, काम करणाऱ्यांची संख्या आज एक कोटीवर आहे. बहुभाषी, बहुधर्मी व जातीव्यवस्थेची उतरंड असलेल्या देशाला एकात्मता प्रदान करण्यात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या या यंत्रणेची कहाणी, इतिहास आणि वाटचाल रोचक आहे.

भारतीय प्रशासन ऊर्फ इंडियन ब्युरोक्रसीचे जनक मानले जातात सरदार वल्लभभाई पटेल. त्यांनी कॉन्स्टिट्यूअंट असेंब्लीत १९४९ मध्ये जे भाषण केलं, त्याचंच फलित म्हणजे ब्रिटिश कालीन ICS प्रशासकीय सेवेची पुनर्रचना करून IAS ही भारतीय प्रशासन यंत्रणा निर्माण झाली. रवींद्रनाथ टागोर आणि जवाहरलाल नेहरू यांना ब्रिटिश ढाच्यात मुरलेली परकीय नागरी यंत्रणा ICS नको होती. पण याच यंत्रणेच्या साहाय्याने भारतातील साडेपाचशेपेक्षा जास्त संस्थाने खालसा करून, भारत एकसंध करण्याची श्रेष्ठ कामगिरी सरदार पटेल व नेहरूंनी केली.

ही बखर आहे भारतीय प्रशासनाची ज्याने प्रथम ब्रिटिश संस्कारातून बरंचसं मुक्त होत, घटनात्मक संसदीय लोकशाही प्रणालीशी आपली नाळ जुळवून घेतली. पुढे मिश्र अर्थव्यवस्थेत सामाजिक व आर्थिक पुनर्रचनेत सहभाग घेतला आणि 'परमीट लायसेन्स' काळात हाती आलेले अमर्यादित अधिकार १९९१ नंतर सोडून विकासाला चालना देणारी फॅसिलेटरची भूमिका स्वीकारली.

ही भारतीय प्रशासनाची बखर आहे, जी लोकप्रतिनिधींना त्यांच्या वर्चस्वासाठी 'अपरिहार्य' अशी गरज बनली आहे. राजकीय नेते व प्रशासकांचं 'चोली दामनचं' नातं जडल्यामुळे धोरण व अंमलबजावणीची आदर्श विभागणी संपुष्टात येऊन नोकरशाहीच्या सुरू झालेल्या घसरणीची ही गाथा आहे. एकेकाळची अभेद्य अशी 'स्टीलफ्रेम' आता किती गंजली आहे व तकलादू झाली आहे, त्याचं विदारक चित्र रेखाटणारी ही बखर आहे.

जेथे अनेक प्रशासकांनी कार्यक्षमतेचे व जनताभिमुख कामाचे मानदंड निर्माण केले आहेत, अशा काही निवडक केस स्टडीजसह सिद्ध होणारी व नोकरशाहीचं सामर्थ्य व सक्षमता सिद्ध करणारी ही बखर आहे.

आणि मुख्य म्हणजे ही भारतीय प्रशासनाची बखर माझ्या पंचवीस वर्षांच्या करिअरच्या वाटचालीत आलेल्या अनुभवांच्या, यशापशाच्या, चिंतनाच्या, निरीक्षणाच्या आधारे व प्रत्यक्ष सहभागाच्या पायावर रचलेली कहाणी आहे.

टीकाकारंनी काहीही भाष्य केलं तरी प्रशासनाचा पेला 'पुरता रिकामा नाही' आणि जनतेच्या व लोकप्रतिनिधींच्या अपेक्षेप्रमाणे तो 'भरलेलापण नाही' हे अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न आहे. जसा 'हिंदू रेट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ' नंतर म्हणजे १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रशासकांनी तीन टक्क्यांवरून आठ-नऊ टक्क्यांपर्यंत वाढवला, तसेच भारतीय प्रशासनाची गतिमानताही अलीकडे वाढली आहे. हे निखळ सत्य पुरावे व निष्कर्षासह सांगणारी ही बखर आहे.

इथे मी जाणीवपूर्वक 'बखर', 'कहाणी', 'गाथा' असे शब्दप्रयोग केले आहेत. भारतीय प्रशासन गतिमान व डायनॅमिक आहे. पण त्यात काम करणारे प्रशासक व कारकून मंडळी ही तुमच्या-आमच्यासारखीच माणसे आहेत. त्यामुळे प्रशासन हा मूलत: मानवी व्यापार आहे. तो मला ललित अंगाने मांडायचा आहे. म्हणून मी 'बखर' हा शब्द वापरत आहे.

बखर वाङ्मय हा रसाळ, पाल्हाळीक, काहीसा अतिरंजित व कथानायकांचे विभूतीकरण करणारा प्राचीन वाङ्मयप्रकार आहे. मला बखरीची रसाळ प्रासादिकता कायम ठेवून भारतीय प्रशासनाचा आधुनिक इतिहास, वर्तमान व भविष्यकाळ मांडायचा आहे. त्याला चिंतन व आत्मपरीक्षणाची जोड असणार आहे, पण

मला हा प्रबंधाचा विषय करायचा नाही. मला भारतीय प्रशासनातील गतिमानता, वैविध्य आणि त्याचं सामाजिक जीवनातलं स्थान मांडत प्रशासनामधील माणूस, कार्यकर्ता आणि राज्यकर्ता या महत्त्वाच्या समाजघटकांचे शक्य तितके पैलू कथन करायचे आहेत. म्हणून मी या लेखमालेला 'बखर : भारतीय प्रशासनाची' असं शीर्षक दिलं आहे.

**सारनामा– भारतीय घटनेचा**

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वोत्तम घटनांपैकी एक मानली जाते, तिचे फार मोठे श्रेय डॉ.आंबेडकरांकडे जाते. त्यांनी घटनेच्या केंद्रस्थानी सामान्य भारतीय माणूस आणला आणि हे राष्ट्र घटनात्मक संसदीय राज्यप्रणालीचं बनवलं.

घटनेची तीन प्राणतत्त्वे म्हणजे: तिचा सारनामा किंवा उद्देशिका (Preamble), मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles) आणि मूलभूत अधिकार (Fundamental Rights). त्यापैकी पहिल्या दोन बाबी कोर्टामध्ये अंमलबजावणीसाठी ग्राह्य मानल्या जात नसल्या तरी, या दोन्हीच्या आशय व प्राणतत्त्वाशी विसंगत घटनादुरुस्ती वा कायदेकानून सर्वोच्च न्यायालय रद्दबादल करू शकते. अनेक उदाहरणांनी हे त्यांनी सिद्ध केलं आहे.

भारतीय घटनेचा सारनामा– प्रिॲम्बल– मोठा विलक्षण व सर्वस्पर्शी आहे. तो जसा फ्रेंच व रशियन क्रांतीच्या तत्त्वावर आधारलेला आहे, तसाच महात्मा गांधींच्या 'स्वप्नातला भारत' साकार करण्यासाठी कटिबद्धता दर्शविणारा आहे. गांधीजी म्हणाले होते 'जेथे गरिबातल्या गरिबाला हा देश आपला वाटेल, जेथे विविध धर्म, पंथ, जाती, जमाती एकदिलाने राहतील, जेथे अस्पृश्यता नसेल आणि मद्य व व्यसनाचा शाप नसेल, स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान अधिकार असतील, तो माझ्या स्वप्नातला भारत देश आहे.' त्यांच्या या आदर्शाचे प्रतिबिंब सारनाम्यात पडलेले दिसून येते. तो सारनामा असा आहे.

*''**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा*
*व त्याच्या सर्व नागरिकांस :*
*सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;***
*विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा*
*व उपासना यांचे **स्वातंत्र्य;***
*दर्जाची व संधीची **समानता;***
*निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा*
*आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा*
*व राष्ट्राची एकता आणि एकात्मता*
*यांचे आश्वासन देणारी **बंधुता***
*प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;*
***आमच्या संविधानसभेत***
*आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी*
***याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.''***

या सारनाम्यातील प्रत्येक शब्दाला विशेष अर्थ व महत्त्व आहे. विविध न्यायनिवाड्यांतून ते ठसठशीतपणे सर्वोच्च न्यायालयाने विशद केले आहे, ते कसे हे आपण प्रथम लक्षात घेऊ.

भारतात अंतिम सत्ता व महत्त्व नागरिकांचे आहे ते 'We, the people' या शब्दप्रयोगाने व्यक्त होते. भारत हा 'सार्वभौम' देश आहे (Sovereign), म्हणजे आपल्याला निर्णयप्रक्रियेचे संपूर्ण स्वातंत्र्य आहे. सार्वभौम सत्ता म्हणून हे राज्य असे कोणतेही कायदे करू शकते, ज्यामुळे आरोग्य, शिक्षण, नैतिकता आणि सुविहित व्यवस्था यांची जनतेला अपेक्षित असलेली पूर्तता होऊ शकेल.

सारनाम्यातील 'समाजवाद' हे राजकीय तत्त्वज्ञान नाही, तर असमानता कमी करण्याची कटिबद्धता दर्शविणारा तो शब्द आहे. सर्वसामान्य व कष्टकरी नागरिकांना चांगले जीवनमान देणे, ही राज्यकर्त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. तसेच समाजवाद म्हणजे सामाजिक न्याय, सामाजिक व आर्थिक क्रांती करून दारिद्रय संपवणे आणि दर्जा व संधीची समानता प्रस्थापित करणे होय.

सेक्युलॅरिझमचा सर्वात जास्त मान्य होणारा आशय म्हणजे ही राजसत्ता 'धर्मनिरपेक्ष' आहे. प्रत्येक नागरिकास आपापला धर्म व उपासनापद्धती आचरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. सेक्युलॅरिझमचे सर्वमान्य तत्त्व म्हणजे 'सर्वधर्मसमभाव' आणि 'धर्म– पंथ निरपेक्षता'.

भारत हा 'लोकशाही' देश आहे. न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता प्रदान करण्यासाठी भारतीय नागरिकांनी ही घटना तयार केली असून, ती त्यांनाच अर्पण (Rededicate) केली आहे.

ही घटनेची उद्देशिका किंवा प्रस्तावना आहे, ती घटनेचा अविभाज्य भाग आहे. ती भारतीय प्रशासनाची बखर सांगताना संदर्भासाठी आवश्यक आहे.

भारतीय प्रशासन व नोकरशाही ही तटस्थ यंत्रणा असून, ती कोणत्याही पक्ष वा पक्षाच्या विचारसरणीला बांधील नाही. घटनेचे प्राणतत्त्व असलेल्या सारनाम्यातील शब्दप्रयोगामागील तत्त्वज्ञान, सामाजिक व तात्त्विक आशय लक्षात घेऊन नोकरशाहीने राजकारभार करायचा असतो. म्हणजे इंडियन ब्युरोक्रसीची पहिली व अंतिम बांधिलकी आणि कटिबद्धता ही केवळ घटनेशी व खास करून सारनाम्याशी असली पाहिजे.

पण मागील साठ वर्षांचा इतिहास पाहता, सारनाम्यातील उदात्त आशय भारतभूमीत रूजलेला नाही असेच म्हटले पाहिजे.

त्याची काय कारणे आहेत? त्यात भारतीय नोकरशाहीचा किती वाटा आहे? हे सारे आपणास तपशीलात जाऊन पहायचे आहे.

**लक्ष्मीकांत देशुमख**
प्लॅट नंबर. १, शामसुंदर सोसायटी, सॅलिसबरी पार्क, पुणे ४११०३७.
Email:laxmikant05@yahoo.co.in
भ्रमणध्वनी : 9325297509



कैफियत

राजन गवस

# माझ्या मनाला मला निरुत्तर करायचंय...

‘बनावट प्रमाणपत्रे विकणारी टोळी जेरबंद’ अशा भल्या मोठ्या मथळ्याची बातमी सकाळी-सकाळी वाचली. अशी बातमी दर पाच-सहा महिन्यांनी वृत्तपत्रांत येत असते. फक्त स्थळ वेगळे असते. सर्वदूर घडणारी ही सततची घटना. कंटाळा यावा अशी. पण आज ही बातमी वाचताना मी थोडा अधिकच कुतूहलयुक्त नजरेने त्या टोळीतल्या आरोपींचे फोटो बघू लागलो. आजूबाजूच्या वावरणाऱ्या टोळीतल्या बेरोजगार तरुणांपैकीच ते. घरंदाज गुन्हा करणाऱ्यांच्या डोळ्यात जे असते त्यापैकी काहीच त्यांच्या डोळ्यात दिसत नव्हते. अगतिक, अपराधी चेहरे आणि पराभूत झालेले ते गुन्हेगार वाटायलाच तयार नव्हते. भल्या सकाळी मी माझ्या मनाला समजावीत होतो- ‘ते गुन्हेगारच आहेत. अशी बोगस प्रमाणपत्रे तयार करून विकणे, हा व्यवसाय कसा होईल? असे करणे समाजविघातकच. असे लोक समाजात असूच नयेत. यामुळे समाज बरबाद होईल. इत्यादी इत्यादी.’ पण माझ्या मनाची पूर्ण समजूत काढणे मला शक्य होत नव्हते. माझे मन त्यांना आजच्या वास्तवात गुन्हेगार मानायला तयार नव्हते. मग मी माझा नेहमीचा खेळ सुरू केला. सवाल-जवाब. हे शस्त्र मला फार उपयोगी पडतं. मनाला निरुत्तर करण्यात मी अनेकवेळा यशस्वी होतो. या ठिकाणी मात्र थोडं अपयश आलं. झालं असं- मनाला मी पहिला प्रश्न विचारला.

‘का बाबा, हे तुला गुन्हेगार का वाटत नाहीत?’

त्याने सुरू केलं, ‘त्यांना गुन्हेगार ठरवायचे असेल तर तुझी यातून सुटका कशी काय होईल? तू यांच्यापेक्षा मोठा गुन्हेगार?’

‘म्हणजे?’ माझा अभावित प्रश्न.

त्याचं सविस्तर उत्तर.

‘तुम्ही प्राध्यापक मंडळी दुसरं काय करता? बोगस प्रमाणपत्रंच वाटता. फक्त तुमची सरकारमान्य दुकानं आहेत. त्यांच्याकडं सरकारमान्यता नाही. यावर तू म्हणणार- असं कसं? पण हा प्रश्नच होत नाही. महाराष्ट्रभरच्या सगळ्या कॉलेजात दुसरं काय होतं. अपवाद आहेत, हे एकदम मान्य. पण अपवाद नियम कसा होईल. मुलं प्रवेश घेतात. निरुपयोगी अभ्यासक्रम त्यांच्या माथ्यावर मारले जातात. एकशेऐंशी दिवस शिकवलं की पुढचा वर्ग. शिकवायचं म्हणजे काय? तर के.सागर, देसाई-लिमये, निराली यासारख्यांची गाईड्स वर्गात वाचून दाखवायची. समजा ही गाईड्स प्रसिद्ध झाली नाही तर कितीतरी लोकांना हृदयविकाराचे झटके येतील. हे तुला मान्य व्हायला हरकत नाही. एकशेऐंशी दिवस संपले की, वर्षाच्या शेवटी परीक्षा. परीक्षा म्हणजे काय? तर तेच ते प्रश्न. पुन्हा पेपर तपासणे म्हणजे काय? पानं पालटणं. तासाला साठ पेपर तपासून होतात. ह्यावर खूप चर्चा झालीय. मग ही कसली आहेत पदवीपत्रे? बोगसच की? सरकारी पैशावर प्रमाणपत्रे वाटणारे तुम्ही सरकारी दुकानदार?’

मनाला थांबवतच मी म्हटलं, ‘हे वास्तव खरं असलं तरी तसं म्हणणं योग्य नाही. कारण ही एक कायदेशीर व्यवस्था आहे. प्रशासन आहे. घटनात्मक रचना आहे. राष्ट्रीय धोरण आहे. उद्दिष्टे आहेत. या साऱ्याच्या पाठीमागे एक शिक्षणशास्त्र आहे. त्याला बोगस नाही म्हणता येणार. त्रुटी असतील, पण हे सारे कायदेशीर आहे!’

‘हो मला मान्य आहे.’ असे म्हणूनच मला थांबवत त्याने सुरू केले.

‘तुमचे सरकारमान्य दारूदुकान. ते लोक अवैध दारूविक्रेते. फरक काय? दोघे दारूच विकणार- एक टॅक्स भरून, दुसरा टॅक्स चुकवून.’

हे ऐकून माझं डोकंच सणकलं. एकदम चीड आली. मनाला थांबवत मी म्हटलं, ‘हे ऐकून घेतलं जाणार नाही. शिक्षणासारख्या पवित्र गोष्टींबाबत असं बोललेलं चालणार नाही. याद राख.’

‘चिडायचं नाही.’ म्हणतच त्यानं सुरू केलं. ‘चिडल्याने विवेक संपतो, शांतपणे बोलण्यानं चर्चा होते. संतापल्यानं वास्तव नाकारता येत नाही. आपण एकेक गोष्ट विचारासाठी घेऊ. नंबर एक- भारतात इंग्रज येण्यापूर्वी शिक्षणव्यवस्था होती की नव्हती? ज्या अर्थी इतकी हजार वर्षे हा समाज चालत आला होता, त्याअर्थी त्यांची त्यांची काही एक शिक्षणव्यवस्था होती. कुणाची गुरूकुल व्यवस्था होती तर कुणाची अन्य काही व्यवस्था होती. त्याशिवाय हा समाज चाललाच नसता. अन्यांच्या व्यवस्थेचे पुरावे नष्ट झाले किंवा केले गेले. नाहीतरी नालंदा, तक्षशीला इथं काय

चाललं होतं, याविषयी आज काहीच कोणी स्पष्ट पुराव्याच्या आधारे बोलत नाही. त्या विद्यापीठांचं सोडून देऊ. मॅकॅले याने इंग्लंडच्या सभागृहात केलेल्या भाषणाचे काय करायचे? आज ते भाषण चर्चेत आहे. तेही खड्ड्यात घालू. स्वातंत्र्यानंतर मॅकॅले च्या शिक्षण व्यवस्थेशी आपल्याला संबंध तोडता आले का? स्वतंत्र भारताचा नागरिक कसा असावा, याचं सुस्पष्ट चित्र आपल्याला लोकांसमोर ठेवता आलं का? तेही जाऊ द्या, ज्ञान आणि नोकरी यांचा संबंध, म्हणजेच शिक्षण आणि नोकरी यांचा संबंध तोडता आला का? आपले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आपल्याला आपल्या देशाच्या गरजेनुसार आखता आले का? आपल्या देशाच्या गरजेनुसार आपले ध्येय, उद्दिष्टे, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके तयार करता आली का? शेवटी शिक्षण म्हणजे काय, याविषयी आपण गंभीर होतो का? कशाचं तुमचं शिक्षणशास्त्र?'

म्हटलं– 'इतके प्रश्न? याचा आणि आपल्या चर्चेचा संबंध काय?'

माझ्या ह्या प्रश्नाने माझे मन जोरजोराने हसायला लागले. शांत होत म्हणाले, 'जाऊ दे. हे कळणारच नाही तुला. तू नेट-सेटच्या जमान्यातला शिक्षक. नेट-सेट झालं की उत्तम शिक्षक होता येतं का? शिक्षकाला प्रशिक्षण ही गरज आहे, हेच न पटणारे लोक नेट-सेटसारख्या भंपक परीक्षांची शिफारस करतात. नेट-सेट झालेला एक मुलगा तोतरा आहे. तो उत्तम शिक्षक होऊ शकेल? नेट-सेट परीक्षा पास मुलगा वर्गात उभाच राहू शकत नाही, तो शिकवू शकेल? कशाचा हट्ट धरत तुम्ही शिक्षणाचं वाटोळं करताहात?'

'म्हणजे काय? गुणवत्ता नकोच.' मी त्याला आडवलं. तर त्याचं सुरू... 'त्येच म्हणतोय. तुमच्या गुणवत्तेच्या संकल्पना काय? ९९% मार्क्स आहेत. पण तो नागरिक म्हणून नापास आहे. तुम्हाला चालतो. नेट-सेट आहे पण मास्तर म्हणून नापास आहे. तुम्हाला चालतो. एम.बी.बी.एस., एम.डी. ९९% आहेत. रुग्ण तपासता येत नाही तरी चालतो तुम्हाला. सगळीकडं हेच चाललंय. ह्या तुमच्या देशात कुणालाच नागरिक नको आहेत. आणि तुम्ही गुणवत्तेवर बोलणार. वशिलेबाजी, खोटी गुणवत्ता आणि फक्त एका साच्याचे गणपती, ही शिक्षणव्यवस्था असू शकते का? आणि गुणवत्तेवर बोलायचे असेल तर ह्या व्यवस्थेत गुणवानाचे स्थान काय? इथला सगळा बुद्धिमान वर्ग कुठल्या तरी खोपड्यात पडलेला किंवा परदेशी गेलेला. इथं गुणवानाला किंमत ती काय? इथं सगळ्यात नालायक माणूस म्हणजे गुणवान! अशी व्यवस्था असते का? या सगळ्याला लोकशाही म्हणता येते का? काय आहे हे सगळं? आता ह्या सगळ्याला टाळण्यासाठी तू म्हणशील, ह्याचा आणि शिक्षणाचा संबंध काय? हे शिक्षणातून आलंय असं कसं म्हणायचं? असले प्रश्न म्हणजे एकदम बथ्थडपणा. हा बथ्थडपणा हा इथल्या व्यवस्थेचा भाग बनलाय. त्यामुळे वास्तव नीट न बघण्याची सवय झालीय.'

म्हटलं– 'म्हणजे काय?'

'बरोबरच. हे अपेक्षितच होतं. म्हणजे काय? हा प्रश्न कुणाच्या मनात येईल. इथली व्यवस्था न बघणाऱ्यांच्या विनाअनुदान संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्यांच्या, भ्रष्ट व्यवस्थेचा भाग असलेल्यांच्या.'

म्हटलं– 'आता हे विनाअनुदानाचे मध्येच काय?'

'वा रे! वाऽऽ याला म्हणतात बथ्थड! मघाशी आपला वाद सुरू झाला तो कोठून? बोगस प्रमाणपत्र विकणारे गुन्हेगार आहेत का, येथून. हे विनाअनुदानवाले कोण? काय करताहेत? यांच्या संस्था कशा आहेत, कुठे आहेत? यांच्या संस्थेत जे शिक्षण दिले जाते ते योग्य आहे का? त्यासाठी भौतिक सुविधा आहेत का? हे बाजूस ठेवू. किमान शिक्षक? किमान इमारत? किमान सुविधा आहेत? हे सगळेच जाऊ द्या. ज्या माणसाने ही संस्था स्थापन केली आहे त्याचा आणि शिक्षणाचा संबंध? या विनाअनुदान शिक्षणसंस्था काढणारे गुन्हेगार किती आहेत? प्रत्यक्ष खुनी किती आहेत? यांचा आणि शिक्षणाचा संबंध काय आहे? ह्यांनी शिक्षणसंस्था काढली म्हणजे काय केले? बोगस प्रमाणपत्रे वाटण्याचे राजरोस दुकान काढले. २० दिवसात बी.एड., महिन्यात डी.एड., ३० लाखात डॉक्टर. इथं साने गुरुजी नावाचा शिक्षक होऊन गेला. गांधीजी या देशातच जन्मले. आगरकर गुरुजी होते. जे.पी.नाईक बहुतेक इथलेच असावेत. या भूमीत ह्या सगळ्या शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांचे डोळे कधी बघितलेस? उन्मत्त, माजोर, खूनशी, यातला एकही डोळा साने गुरुजींच्या डोळ्यातला प्रेमभाव, करुणा, आस्था जोपासणार आहे? सगळे शिक्षणसम्राट एका ओळीत उभे करून फक्त त्यांचे डोळे सामान्य माणसासमोर ठेवले आणि त्यांना विचारले हे लोक कोण असू शकतील? तर उत्तरे काय येतील? याउलट बनावट प्रमाणपत्रे विकणाऱ्यांचे फक्त डोळे सामान्य माणसासमोर ठेवले तर उत्तरे काय येतील? हिंमत असेल तर प्रयोगच करून बघ. याचा अर्थ मी बनावट प्रमाणपत्रे विकणाऱ्यांच्या बाजूचा आहे असे नाही. ते गुन्हेगार आहेतच. पण त्यांच्यापेक्षा मोठे गुन्हेगार शासनाच्या आश्रयाने राजरोस 'महर्षि' झालेत त्याचे काय? ह्या शासनाचं काय? राज्यकर्त्यांचं काय? शिक्षणाचं काय? बोल ना, एकदम खुलं बोल!'

काय बोलणार? मला उत्तर सुचत नव्हतं. सुचत नाही. मी हतबल झालोय. पण हा प्रश्न मला मिटवायचाय. काय करावं? मला माझ्या मनाला निरुत्तर करायचंय. त्याशिवाय मी सुखानं जगू शकत नाही. तुम्हाला काही सुचलंच तर कळवा. कारण या व्यवस्थेतला मी एक हतबल मास्तर आहे. आणि तरीही मला जगायचं आहे. माझ्या मनातली घालमेल संपवायची आहे.

---

**राजन गवस**

मु.पो.गारगोटी, ता. भुदरगड,

जि. कोल्हापूर.

मोबा. : 9422580517

---

आणि मृगाचा पाऊस आला...

ज्ञानदा नाईक

# कोणतेही झाड हे एक कलापूर्ण बांधकाम असते!

डिसेंबर महिन्याची दुपार. कुठंतरी पाऊस झाला होता. त्याचा गारवा हवेत होता. उन्हाचा पत्ता नव्हता. अशा दुखऱ्या हवेत अस्वस्थ वाटतं. जेवणं आटोपली होती. 'द कंट्री डायरी ऑफ ॲन एडवर्डियन लेडी' हे एडिथ हॉल्डन या निसर्गप्रेमी बाईचं पुस्तक मी वाचत होते. १९०६ साली बाईंनी शब्दांत आणि चित्रात पकडलेले निसर्गाचे अद्भुत आणि रमणीय रूप. ब्रिटिश कंट्रीसाईडचे बदलते ऋतुचक्र. अप्रतीम जलरंगचित्रे आणि टाकाने लिहिलेला भावस्पर्शी मजकूर. एखाद्या प्रसन्न पहाटेसारखे हे पुस्तक चित्तवृत्ती उल्हसित करणारे होते. माझे हे आनंदवाचन बाहेरून लयबद्धपणे येणाऱ्या 'काड्काड् काट्...' अशा आवाजाने विस्कटून गेले. तो कठोर आवाज मनावर घाव घालू लागला.

पुण्याच्या डेक्कन जिमखाना भागात भर दुपारी असे काड्काड् आवाज येतात. हातात उंच आकड्या घेऊन बंगल्यांच्या बागेत वाढलेल्या आंबा, पेरू, रामफळ, जांभूळ, शिरीष, गुलमोहर वृक्षांच्या वाळलेल्या फांद्या काढून त्या जळणासाठी गोळा केल्या जातात. कटाकटा मोडून त्यांचे भारे बांधणारी बाया, पोरे, बापे दिसतात. समजावलं, हटकलं, रागावले तर तात्पुरते निघून जातात. पुन्हा तासाभरात दुपारच्या शांत वातावरणाला चरे पाडणारे आवाज सुरू होतात.



पुस्तकात खूण घालून मी उठले. बाहेर येऊन पहाते तो शेजारच्या गुलमोहरावर सुमारे ४० फूट उंचावर एक माणूस चढून फांद्यावर घाव घालत होता. खाली रस्त्यावर पक्ष्यांच्या पिसासारख्या हिरव्यागार पानांची आणि ओल्या जखमी फांद्यांची गर्दी झाली होती. त्याच्या भोवताली वर पाहणारे दोन गडी उभे होते. रस्त्यावर वाहतूक नेहमीप्रमाणे चालू होती. पायी चालणारेही येत-जात होते. नेहमीच्या आणि आजच्या या रहदारीत थोडा फरक होता. झाड तोडताहेत हे दिसल्यावर आपल्या अंगावर काही पडत नाही ना, हे क्षणभर थबकून पाहून प्रत्येकजण पुढे जात होता एवढेच. ज्या फांद्या धडावेगळ्या केल्या जात होत्या, त्याच्याजवळच तिसऱ्या मजल्यावरच्या गच्चीत एक गृहस्थ कमरेवर दोन्ही हात ठेवून झाडाचे शिरकाण वर मान करून लक्षपूर्वक पाहात होते.

आमच्या घरासमोर एक

आणि कुंपण संपल्यावर लगेच शेजारच्या इमारतीपाशी असे हे दोन गुलमोहर जुळ्या भावंडांसारखे गेली काही वर्षे फांद्यांचा प्रचंड विस्तार घेऊन डौलाने उभे होते. डोळ्यांना आल्हाद देत होते. साळुंक्या, मैना, बुलबुल असे पक्षी त्यांच्या गार सावलीला येऊन मंजुळ शब्द करायचे. आजूबाजूच्या घरांमुळे, सावलीमुळे हे दोन्ही वृक्ष बरेचसे रस्त्यावर झुकले होते. थकलेभागले मजूर, मोलकरणी, यांच्या छायेला विसावायचे. शाळेतली पोरे कोंबडा का कोंबडी विचारत फुले गोळा करायची. कोरी सुरेख गाडी याच्या सावलीला लावून ड्रायव्हरमंडळी सीट मागे करून निवांत ताणून द्यायची. मार्च महिन्यात ही झाडे भगवी व्हायची अन् फुलांच्या सड्याने जाणाऱ्या-येणाऱ्यांना मखमली पायघड्या घालायची.

वडील म्हणायचे, 'कोणतेही झाड म्हणजे वास्तुशास्त्राच्या दृष्टीने एक कलापूर्ण बांधकाम असते.' खोडाची जाडी, फांद्यांचा विस्तार. डहाळ्या, एकंदर उंची झाडाला मिळालेला तोल, आकार, जमिनीतल्या मुळ्यांची जाडी आणि विस्तार लक्षपूर्वक पाहिला तर यामागे उत्तम रचना आहे हे ध्यानात येते. एखादी फांदी जरी आपण तोडली तर सगळा तोल बिघडतो.

आणि ही मंडळी एखादीच नाही तर अनेक फांद्या छाटत होती. काय प्रकार होता? सवयीने ठाऊक झाले होते की मधून मधून महानगरपालिकेची मंडळी वीजेच्या तारांना फांद्या अडचण करतात, म्हणून झाडे छाटायला यायची. वडील फार संतापायचे. अधिकाऱ्यांना फोन करायचे अन् आमचे वृक्ष अबाधित राहायचे.

'तुम्ही महानगरपालिकेचे लोक आहात का?'

मी चौकशी केली.

'नाही. हे वर साहेब उभे आहेत त्यांनी बोलावलंय. त्यांच्या गच्चीत फांद्या येतात. पानांचा कचरा पडतो.'

'पण मग त्यासाठी जवळजवळ निम्मे झाड उतरवलेय तुम्ही.' मी ओरडले. लक्षात आले की ज्याचे झाड आहे तो मालक, ज्यांना या झाडाने सावली दिलीय तो शेजार सारे घरात चिडीचूप आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्यांतला कुणी पर्यावरणवादी यांना अडवत नाही. कचरा पडतो म्हणून झाडच तोडायचे? मुलाने मांडी ओली केली तर मांडीच कापण्यासारखा हा प्रकार नाही का?

लहानपणी वाचलेली बिष्णोईंची कथा आठवली. राजस्थानच्या मरूभूमीत घडलेली ही कथा. राजाच्या महालासाठी लाकडे हवीत म्हणून हुकूम सुटला. राज्यातल्या एका खेड्यात बरीच झाडे असल्याची माहिती मिळाली. प्रधानाने झाडे कापून लाकडे आणण्यासाठी लोक पाठवले. गावातल्या लोकांनी पावसाचा अभाव असलेल्या कोरड्या वालुकामय जमिनीत थेंबथेंब पाणी वाचवून ती झाडे जगवली, वाढवली होती. लेकरांसारखी माया होती आपल्या वृक्षांवर त्यांची. ते वृक्ष तोडण्याचा राजाचा हुकूम झाला हे कळल्यावर सारे गावकरी चिंतेत पडले. साऱ्यांनी एकत्र येऊन शपथ घेतली की 'राजहुकूमाची तोहीम झाली तरी हरकत नाही. प्राणांची बाजी लावू अन् ही पोटच्या पोरांइतकीच प्रिय झाडे वाचवू. लाकूड नेण्यासाठी आलेली राजाची माणसे गावकऱ्यांनी परत पाठवली. प्रत्यक्ष राजाज्ञेचा अवमान एका छोट्या गावानं करावा म्हणजे काय? प्रधान संतापला. त्याने पुन्हा कुऱ्हाडी घेऊन माणसं पाठवली. बरोबर सैनिकही पाठवले. सैन्यासह वृक्ष तोडायला लोक आले म्हटल्यावर सारा गाव एकेका वृक्षाला मिठी मारून उभा राहिला. 'पहिला घाव आमच्यावर बसेल मग झाडांवर.' त्यांचा निर्धार पाहून सैन्य कचरले. आलेल्या लोकांना कुऱ्हाडी उचलवेनात. मग मात्र प्रधान फारच संतापला. जातीनिशी तो हजर झाला. सेनापतीलाही त्याने सोबत आणले. आज्ञा सुटल्या... 'झाडे तोडा, कुऱ्हाडी चालवा.' सैनिक आज्ञाभंग करेल त्याच्यापाशी धारदार तलवार पाजळत उभे राहिले. आलेल्या कामगारांचा नाईलाज झाला. कुऱ्हाडी चालू लागल्या, वृक्ष आणि त्याबरोबर गावकरी कोसळू लागले. हाहाकार उडाला. राजाला बातमी कळली, तशी त्याने घटनास्थळी धाव घेऊन हा संहार थांबवला. गावच्या मुखियापुढे राजाने क्षमायाचना केली. मुखियाने १० वर राजाकडून मागून घेतले, त्यात वृक्षांचे संपूर्ण संरक्षण करण्याची अट या बिष्णोईंची होती.

सुंदरलाल बहुगुणांचे चिपको आंदोलन भारतभर गाजले. वृक्षांचे जतन आणि जोपासनेचे महत्त्व मानवाने जाणले.

वृक्ष अमाप तोडीमुळे जंगले, वने नाहीशी झाली. पर्यावरणाचा तोल बिघडला. अनेक प्रश्न उभे राहिले भस्मासुरासारखे. ग्लोबल वॉर्मिंगचे महाभयानक संकट पृथ्वीवर ओढवले.

माणूस उशिरा का होईना जागा होतो आहे, शहाणा होतो आहे, असे चित्र दिसू लागले. नवी झाडे लावणे सुरू झाले. वृक्षतोडीला बंदी आली. आहेत त्या झाडांचे संवर्धन करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले.

तरीही अजून रस्तारुंदीकरणासाठी हजारो भरदार वृक्ष तोडले जातच आहेत. इमारती बांधण्यासाठी टेकड्या बोडक्या केल्या जाताहेत. बंगल्यांच्या जागी फ्लॅट उभे करण्यात भोवतालच्या वनराईचा चेंदामेंदा केला जातो आहे... आणि गच्चीत अडथळा होतो व कचरा पडतो म्हणून उच्चभ्रू समाजातले, उच्चशिक्षित समंजस नागरिक भव्य प्रचंड गुलमोहराचा विस्तार तोडून त्याचे एकच फांदी असलेले २५/३० फूट उंचीचे केविलवाणे खोड शिल्लक ठेवण्यात धन्यता मानताहेत.

---

**ज्ञानदा नाईक**

११०/१० अक्षर, १४ वी गल्ली,
प्रभात रोड, एरंडवणे,
पुणे ४११००४.
भ्रमणध्वनी : 9822864834

---

# साहित्य संमेलन आणि आ. आ. आम्ही!

संजय भास्कर जोशी



संजय उवाच

आस्वाद स्पंदनांचे उत्सव

मराठी साहित्यविश्वाचा एकूण नूर आणि सूर पाहता, एक ना एक दिवस आम्हाला कोणी ना कोणी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी उभे राहायचा आग्रह करणार हे अगत्याचं, मोलाचं आणि उचितच होतं. खरं तर अपेक्षितच होतं. अखेर आमच्याच सुपुत्रानं तो विषय काढला. सकाळी चहा पितापिता पित्याला (म्हणजे आम्हाला) तो म्हणाला, 'बाबा, तुम्ही का हो नाही उभे राहात या इलेक्षनला? तुम्ही पण रायटर ना, बाबा?' (त्याचं वाचन चांगलं आहे. वाङ्मयाची जाणही सखोल आहे त्याला.) आमच्या पत्नीनेही त्याच्या सुरात सूर मिसळला आणि आम्ही खरे सांगायचे तर, गहिवरून आलो / गहिवरलो. (जो शब्दप्रयोग योग्य असेल तो खोडा, आय मीन ठेवा. उरलेला खोडा. सॉरी फॉर द स्लीप ऑफ द टंग्ज.)

अमेरिकेच्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पानतावणे हे तर ठरलेलेच आहे आणि महाबळेश्वरच्या संमेलनात ऑलरेडी रा.रा. यादव आणि सा.सा.सारडा उभे आहेत त्यामुळे तो प्रश्नच मिटला. (रा.रा. म्हणजे राजमान्य राजश्री तसेच पुनरुक्ती टाळण्यासाठी 'सासा' म्हणजे साक्षेपी साहित्यिक.' तो केवळ प्रास साधायचा, प्रयास नव्हे. आणि 'सा' म्हणजे सार्वजानिक नव्हे हे लक्षात घ्यावे.) त्या रारा आणि सासांच्या झोंबीत आपण कशाला पडा? तेव्हा पुढच्या वर्षीचे 'विश्व मराठी संमेलन' कुठे होईल, याचा अंदाज बांधायला आम्ही सुरुवात केली. यंदाच्या खर्चाचा अंदाज घेता, ते जवळपास कुठेतरी म्हणजे आमच्या मते ते बँकॉक किंवा पटाया येथे होईल. तेव्हा त्यासाठी मोर्चेबांधणी करायचे आम्ही ठरवले. बँकॉक ही तर थायलंडची राजधानी आणि पटाया ही पर्यटकांची राजधानी. दोन्ही ठिकाणी 'मसाज' हा मुख्य व्यवसाय ! मराठी साहित्यिकांना आवडेल असेच हे पर्यावरण. (संपादक, प्रकाशक, विक्रेते, वाचक...कुणाकुणाचा करू सांगा - मसाज !) कुणा नवख्या कादंबरीकारानं तर म्हणे 'मसाज' नावाची कादंबरी लिहिल्याचेही ऐकिवात आहे. (अर्थात कादंबरीच्या क्षेत्रात तेव्हा नवखे असलेले हे सद्‌गृहस्थ नाट्यक्षेत्रात मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावरचे दिग्गज होते. असो.)

अध्यक्षपदासाठी उभे राहायचे म्हणल्यावर सर्वप्रथम आम्ही आमचे स्पर्धक कोण असतील याची चाचपणी सुरू केली. पहिले म्हणजे अर्थातच आमचे परममित्र राजन खान असणारच. यंदा विश्रांती घेऊन ते पुढच्या वर्षी नव्या जोमाने येणार ही शक्यता आहे. पण त्यांना संमेलनाध्यक्षपद किंवा नोबेल, यातले कोणतेही एक चालणार असल्याने आम्ही त्यांच्याबाबत वेगळीच रणनीती आखत आहोत. शिवाय ते आमचे परममित्र आणि निर्मळ मनाचे असल्याने त्यांचा कात्रज करणे सोपे जाईल. दुसरे म्हणजे रारा यादव किंवा सासा सारडा यांतले यंदा पडतील ते आमचे स्पर्धक असणार. एक बरे आहे, सासणे, मतकरी, नेमाडे, श्याम मनोहर, पठारे, सारंग वगैरे चांगले चांगले, दर्जेदार दर्जेदार, थोर्थोर श्रेष्ठ श्रेष्ठ लेखक या निवडणुका-फिवडणुकांच्या भानगडीत मुळातच पडत नसल्याने त्यांच्याकडून काहीच धोका किंवा दगाफटका संभवत नाही. बघा आमचा चाणाक्षपणा ! स्पर्धेच्या दृष्टीने सर्वाधिक धोकादायक अशा या लेखकांना थोर म्हणून टाकून त्यांच्याकडून स्पर्धा होणार नाही अशी सोय आम्ही किती सहजगत्या करून टाकली ! विचार करकरून अशा थोर लेखकांच्या या यादीत अजून खूप नावे टाकायला हवी. तेवढीच स्पर्धा कमी. त्यासाठी आमचे दुसरे परममित्र आणि थोर लेखकांचा कोष असे मा.मा. हरिश्चंद्र थोरात यांचा सल्ला घ्यावा. (मा.मा. म्हणजे माननीय मातब्बर होय, त्यांच्या रूपावरून वाटतात तसे 'मार्क्सवादी' नव्हे हो !) बरे त्यांचाच सल्ला घेतल्याने तेही आपोआप बाद होतील! थोर समीक्षक रारा रा. ग. जाधव आणि हा.हा. हातकणंगलेकरांमुळे हल्ली समीक्षक सुद्धा या भानगडीत पडतात तेव्हा ती काळजी घ्यायला हवी. ('हा.हा. म्हणजे 'हायली हार्टी' अर्थात अत्यंतिक सहृदय होय.) यंदा पडले तर सासा सारडांकडून तो धोका आहेच आम्हाला. बरे आजवरच्या जा.जा. जाधव, भा.भा. भेंडे वगैरे अध्यक्षांच्या चालीवर रारा यादव किंवा सासा सारडा यातले जे जिंकतील ते संमेलनानंतर मात्र अध्यक्षपदात कसा काही अर्थ नाही असा लेख 'अंतर्नाद'मधे लिहीतीलच. त्यामुळे अजून चार पाच नावे गारद होतील असाही अंदाज आम्ही बांधला. (आता दर वेळी आम्ही 'जा.जा.' म्हणजे काय अन 'भा.भा.' म्हणजे काय वगैरे सांगत बसणार नाही. जाणकारांनी आपापल्या कुवतीप्रमाणे त्याचे अर्थ लावावेत. पण ती सर्वच लेखक आणि विशेषणे थोर आहेत हे ध्यानात ठेवले म्हणजे झाले.) एकूणात आमचा मार्ग आमच्या मनातल्या मनात सुकर होत चालला.

म्हणजे खरा धोका दुय्यम किंवा तिय्यम लेखकांकडूनच आहे. (कोण रे ते तिकडून आम्हाला म्हणाले, 'म्हणजे तुमच्याचसारख्या तुमच्या गटवाल्यांकडून' असे? ) अशा दुय्यम - तिय्यम (पण दाबून पैसे मिळवणाऱ्या) लोकांच्या लेखनाचा सखोल अभ्यास करण्याचे व्रत सध्या रेखा इनामदार-साने यांनी घेतले असल्याने त्यांना गाठणे आवश्यक आहे. खरे तर सिनेमा नाटकातच अशी बर्वे-इनामदार, कुलकर्णी-देव वगैरे डब्बल आडनावे लावायची पद्धत असताना या थोर साहित्यिक, अभ्यासक बाईंनी आपले 'अस्तित्व' डब्बल दाखवायला असे डब्बल नाव का लावावे, याचाही एकदा शोध घ्यायला हवा. मुदलात बाईंचे पतीदेव त्यांनाही (म्हणजे बाईना,पतीदेवांना नव्हे) न कळणारी

गीतेवरची श्रेष्ठ पुस्तके लिहीत असताना बाईंनी असल्या आम जनतेला आवडणाऱ्या पुस्तकांवर अभ्यास का करावा? अस्तित्ववाद वगैरे भलभलत्या (त्याचाही आम्ही एकदा अभ्यास करणारच आहोत) विषयांवर लिहिताना एक नाव आणि बाबा कदम, सुहास शिरवळकर वगैरेंवर लिहिताना दुसरे नाव असे लावणे जास्त सयुक्तिक नसते का ठरले? म्हणजे अस्तित्ववादावर लिहिणाऱ्या त्या रेखाबाई साने आणि पॉप्युलेशन लिटरेचरवर लिहिणाऱ्या त्या रेखाताई इनामदार असे समजून लोकांची सोय नसती का झाली? (वरील वाक्यात पॉप्युलिस्ट, पॉप्युलर, पॉप्युलेशन... यापैकी चुकीचा शब्द आढळल्यास तो मुद्रणदोष समजावा.) असो.

या बाबतीत (म्हणजे साहित्य संमेलनाच्या बाबतीत, रेखाताईच्या नव्हे. त्या बाबतीत केवळ त्याच! असो. ) हमखास उपयुक्त (हा 'उपयुक्त' शब्द आम्हाला नेहमी आयुक्त, उपायुक्त सारखाच वाटतो, तेव्हा अक्षरजुळणी करणाऱ्याने काळजी घ्यावी, म्हणजे नसते गैरसमज नको. कारण 'उपायुक्त' हा 'उपयुक्त' असतोच असे नव्हे. असो.) हमखास उपयुक्त ठरतील असे मूळचे नगरवासी आणि आता पुणेकर झालेले थोर प्रकाशक, संपादक, सदरकार, लेखक, कादंबरीकार (अशीच अजून चार पाच जबरदस्त विशेषणे लावून यांनाही स्पर्धेतून गारद करावे हे बरे. हो! कोणाचा काय भरोसा.) आणि आमचे परममित्र जा.जा. श्री. अरुणभाऊ जाखडे यांचा सल्ला घ्यावा असे आम्ही ठरवले. (टीप : रा.ग. जाधवांच्या वेळचे 'जाजा' आणि जाखडयांच्या वेळचे 'जाजा' निराळे बरे का. - संबंधितांनी नोंद घ्यावी.) अरुणभाऊंचा सल्ला म्हणजे पुराणात जशी ती सत्यभामेची पारिजातकाची फुले फेमस झाली तसा प्रकार. त्याचं काय आहे, की अरुणभाऊंचा सल्ला त्यांच्या गटातले लोक आणि त्यांच्या विरोधी गटातले लोक सारख्याच हक्काने आणि विश्वासाने घेत असतात. गंमत म्हणजे अरुणभाऊंचा सल्ला दोन्ही बाबतीत सारखाच प्रामाणिक, सारखाच उपयोगी, सारखाच निरुपयोगी आणि सारखाच निरुपद्रवी असतो. उगीच नाही दिवसा मसापमध्ये तावातावाने विश्व मराठी संमेलनावर बोलणाऱ्या अरुणभाऊंना संध्याकाळी थेट अमेरिकेतून देवकुळेंचा आयएसडी फोन येतो - सल्ला मागायला ! (सल्ला बहुतेक विश्व साहित्य संमेलनाचं बजेट कसं सांभाळावं यावर असेल !) त्यामुळे कँपेन मॅनेजमेंटबाबत अरुणभाऊंचा सल्ला घ्यायचं आम्ही नक्की केलं आहे.




अर्थात तत्पूर्वी आम्ही वा.वा. वि.भा. देशपांडे यांना सदिच्छा भेट द्यायला जाणारच आहोत. 'सांप्रतचे भरतमुनी' असाच त्यांचा उल्लेख आम्ही खाजगीत करतो हे या प्रसंगी जाहीर करायला हरकत नाही. साहित्यिक मानाची, वाङ्मयीन प्रगतीची आणि टिळक रोडची सुरुवात यांच्याच कार्यालयाने होते. तेव्हा प्रथम तुला वंदितो.

देव करो (नुसता देव बरे, देवकुळे नव्हे !) पण अध्यक्षीय निवडणुकीबाबत काही तांत्रिक, कायद्याच्या भानगडी उपटल्याच तर आदरणीय विश्वनागरिक मी.मी. मीनाताई प्रभू (म्हणजे पुन्हा प्रभू म्हणजे देव आलाच) यांचा सल्ला घ्यायचे आम्ही ठरवले आहे. मी ना, मी ना म्हणत मीच, मीच म्हणायचा सराव असलेला बरा. शिवाय बँकॉक-पटायामधेही आदरणीय, वंदनीय मीनाताईंचा एखादा प्रासाद असणारच. अध्यक्षपदाचे भाषण करून घाम पुसायला जागा तर हवीच ना! एक मात्र आहे, प्रवासवर्णने पॉप्युलेशन लिटरेचर मधे येतात का ते एकदा रेखाताई इनामदारांना विचारायला हवे. लग्नानंतर आमच्या हिच्या आग्रहाने एकदा श्रीक्षेत्र नाशिकजवळच्या वणीला गेलो होतो त्याबद्दल एक पत्र आम्ही मेहुणीला लिहिले होते. त्यातला काही (म्हणजे सुमारे ८७% व्यक्तिगत) मजकूर वगळता ते एक प्रवासवर्णनच आहे. उगाच अध्यक्षपदाच्या एलिजिबीलिटीबाबत हयगय नको इतकेच हो!

याबाबत एक मात्र नक्की. आपण प्रवासवर्णनकार आहोत का समीक्षक, कथाकार आहोत का कवी, चरित्रकार आहोत का कादंबरीकार हे सारे सारे गौण समजायला शिकायला हवे. तुम्हापासून काय लपवायचे? आम्ही औद्योगिक क्षेत्रातून आलो. असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट पदावरून आलो. जे पिकते ते विकावे यापेक्षा जे विकते ते पिकवावे यावर आमची अंमळ अधिकच श्रद्धा. तेव्हा सध्या काय विकत आहे त्याचा शोध घेऊन आम्ही तेच पिकवले तर आम्हास आपण दोष द्याल का? आम्हांस सद्बुद्धी म्हणा किंवा दुर्बुद्धी झाली म्हणा, आम्ही लक्षावधी रुपये देणारी नोकरी सोडून या साहित्यक्षेत्रात आलो. परंतु आता आम्हास हे क्षेत्र तर अधिकच मौजेचे वाटत आहे. येथले एकेक धुरंदर जर आमच्या औद्योगिक क्षेत्रात असते तर मोठेच मानमरातब मिळवून दांडगे दांडगे सरदार झाले असते. असो. (टीप : दांडगे म्हणजे मातब्बर हो! इथे त्या दा.दा. दत्ता दंडग्यांचा काही संबंध नाही, बरे का. अजून ते 'सोऽहम कोऽहम' करत असल्याने त्यांचा 'अहम' जागा व्हायचा आहे, तेव्हा तूर्तास त्यांच्याकडून विशेष धोका नसावा !)

हा साराच प्रकार तुफान विनोदी आहे असे म्हणताच आमचे परममित्र मुकुंदराव टाकसाळे, किंवा हा साराच प्रकार मानवी मेंदूचा अनाकलनीय भंपकपणा दाखवतो असे म्हणताच आमचे सन्मित्र सुबोधराव जावडेकर, किंवा ही धुळवड म्हणजे साखर कारखान्याच्या निवडणुकीसारखीच आहे असे म्हणताच आमचे आदरणीय स्नेही रवींद्रजी शोभणे असे अनेकजण आमचे तोंड चुकवून चालते झाले याचा अर्थ काय? - या प्रश्नात आम्ही सध्या गुंग आहोत. आमचे नेणीवेतले मन म्हणते, की हे तथाकथित सन्मित्र याबाबतीत आमचे प्रतिस्पर्धी आहेत. तेव्हा सावध असावे हे बरे. सन्मित्र, परममित्र म्हणताना आम्ही बेसावध नाही याचीही संबंधित मित्रवर्गाने नोंद घेतलेली बरी. (हो! या 'प्रतिस्पर्धी' शब्दावरून आठवले, त्या का.का. किरण नगरकराला एकदा श्रेष्ठ साहित्यिक ठरवून स्पर्धेतून बाद करायला हवे. कोणाचा काय भरोसा? लेकाचा ऐनवेळी बाजी मारावयाचा! उगाच रिस्क नको.)

— — — — — — — — — — — — — —

***संजय उवाच :*** *खुळी माणसे खुळेपणा करतील. शहाणी माणसे शहाणपणा करतील. पण संमेलने हवीतच. त्या निमित्ताने घुसळण झाली तर बरेच. आमचे परममित्र रमेश इंगळे किंवा मंगेश काळे आमच्यावर टीका करोत भले, पण घुसळण हवीच. मिसळण हवीच. मामा थोरात आणि आदरणीय रेखाताई इनामदार यांनी आपापले अनुक्रमे थोर्थोर आणि पॉप्युलिष्ट घोडे ओळीने उभे करावेत अन् दंगा माजवून द्यावा. (आम्ही नुसतेच घोडे, इकडेही नाही अन् तिकडेही नाही. मामा थोरात आम्हांस थोर समजत नाहीत आणि आम्हाला दाबून पैसा मिळत नसल्याने रेखाताई आम्हाला पॉप्युलिष्ट मानायला तयार नाहीत.) असो. या निमित्याने थोर्थोर म्हणणारे जिमिनीवर यावेत हे बरे अन् भंपकांचे भंपकपण दिसेल तर तेही बरेच. आपापल्या गावात, गल्लीत अन् मोहल्ल्यात, घरात अन् माजघरात बाजी मारणारे बहुत जाले. आम्हास काय, मौज आली की बरे. संमेलन असो की जत्रा, कुस्त्या हव्या, सर्कस हवी, शर्यती हव्या, शेव-गुडदाणी हवी. मौज हवी. (आम्ही सामान्य, मौज म्हणजे मज्जा, येथे दुसरा कोणता श्लेष नाही हो!!)*

— — — — — — — — — — — — — —

***तळटीप :*** *शीर्षकातले ''आ.आ. आम्ही ''म्हणजे 'आजन्म आपलेच' होय !*
*(अरे कोण रे तिकडून म्हणाला, ''या उवाचवाल्याचं 'आआ' म्हणजे 'आचरट आचार्य'-'' असे?) असो. आम्हांस आता असल्या आगळिकीकडे दुर्लक्ष करायला शिकायला हवे.*

**- संजय भास्कर जोशी**
स्नेहसिंधू, ई-३, गजानन सोसायटी, कृष्णा कॉलनी, 'वनाज'जवळ, पौड रोड, पुणे ४११०२९.
Mob. : 9822003411. email : swaraart_swapne@yahoo.com

## हार्दिक निमंत्रण

**प्रा. ग. प्र. प्रधान** लिखित **'टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद'** या पुस्तकाचे रशियन भाषांतर प्रसिद्ध होत आहे. **श्रीमती शोभनाताई रानडे**, विश्वस्त सचिव, गांधी स्मारक राष्ट्रीय समिती यांच्या हस्ते प्रकाशन होईल. **श्री. अॅन्ड्रयू नझारकीन**, व्हाईस कौन्सिल व डायरेक्टर, कल्चरल सेंटर ऑफ रशिया, मुंबई हे अध्यक्षस्थानी असतील. भाषांतरकार **डॉ. अजित कात्रे** व पुणे विद्यापीठाचे रशियन भाषा विभाग प्रमुख **डॉ. चेतन ठकार** याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

स्थळ : **कस्तुरबा समाधी हॉल**, आगाखान पॅलेस, नगर रोड, पुणे.

दिनांक व वेळ : मंगळवार दि. **२० जानेवारी २००९, दुपारी ४ वा.**

आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहावे, ही विनंती.

विनीत,

**आप्पासाहेब सा. रे. पाटील**
कार्यकारी विश्वस्त, साधना ट्रस्ट

**डॉ. नरेंद्र दाभोलकर**
संपादक, साधना साप्ताहिक
विश्वस्त सचिव, साधना ट्रस्ट

कानगोष्टी

गौतम कांबळे

# आठखुरी मेंढी

एस.टी.च्या प्रवासाने मी जाम वैतागलो होतो. स्टँडवरती उतरलो. समोर दिसणाऱ्या उडप्याच्या हॉटेलात चहा घेतला. आता थोडं बरं वाटायला लागलं. तंबाखू मळली आणि घराच्या दिशेने चालायला लागलो. एवढ्यात मला कुणीतरी हाक दिली. आवाज ओळखीचा वाटला. थांबलो. माझ्या भावकीतला बबन सोनावणे घाईघाईनं माझ्याकडंच येताना दिसला. हातात गावाकडून आणलेली पिशवी बघितल्यावर माझ्या लक्षात आलं. बहुतेक याचं नाहीतर भावकीतल्या कुणाचं तरी माझ्याकडं काही महत्त्वाचं काम असलं पाहिजे; त्याशिवाय हा गडी माझ्या गावापासून इथपर्यंत येणार नाही.

'तू अचानक इकडे कसा?'

'मास्तर, काम तसं घाईचंच हाय, तू भेटतोस का नाही याचीच पंचाईत व्हती. म्हटलं टाकावी एक फेरी तुझ्याकडं. आदमास काढून मगच आलो तुझ्याकडं... बरं बायको-पोरं बरी हाईत न्हवं? म्हटलं, आईची काळजी तू अज्याबात करू नगं, मी खवण्या हाय तिकडं... असं बरंच कायबाय बबन सांगू सांगला. मी त्याला थांबवत आधी चहा-पाण्याचं विचारलं. पुन्हा एकदा तोंडातली तंबाखू थुंकून आम्ही दोघंही चहाला गेलो.

घरी पोचायला किमान अर्धा तास लागणार होता. मी रिक्षा करू या म्हटलं तर बबनराव ऐकायला तयार नव्हता. म्हणाला, 'मास्तर, ढेंगभर जाग्याला रिक्षा कशाला? जाऊ की चालत-बोलत!' चालण्याच्या ओघात बबनरावांनी माझ्या बदललेल्या गावाकडचं बरंच काहीबाही सांगायला सुरुवात केली, 'मास्तर, पयल्यासारखं गाव आता राह्यलं नाही, सगळंच इपरीत झालंय. कुणाचा ताळमेळ कुणाला नाही. तुझ्या वक्ताला गावात चार पार्ट्या व्हत्या. त्यातली आता एकबी धड नाही. डेरीतबी तसंच झालंय. उचापत्या करणाऱ्या पोरांनी गळ्यात माळा घातल्या त्यापास्नं गावात भांडणं न्हाई का मारामाऱ्या नाहीत...



आम्ही आता घराजवळ आलो होतो. मी बबनला म्हणालो, 'आता आपण घरी जाऊ, निवांत बोलू!' त्याचा आवाज बारीक झाला. थोडा वेळ असा-तसाच गेला. माझ्या बायकोनं विचारलं, 'चहा ठेवते.' मी मध्येच तोंड घातलं, 'चहा नको आता जेवायलाच वाढ.' दरम्यानच्या काळात बबन बरंच काही सांगत होता. '...मास्तर, आता मुद्याचं बोलतो. गेल्या पस्तीस वर्षात आपल्या भावकीत 'करेवा' झाल्याली नाही. सगळ्यांनी मिळून 'करेवा' करायचं ठरीवलंय. तवा तुझा ईच्चार काय हाय त्यो आमास्नी कळावा म्हणून भाऊबंदांनी मला तुझ्याकडं

पाठिवलंय...' त्याचं ऐकल्यानंतर मी काहीच बोललो नाही. माझ्या आतून भयंकर कालवाकालव सुरू झाली.

दरम्यान आमचं जेवण आटोपलं होतं. त्याला गावाकडं वस्तीच्या गाडीनं जाण्याची घाई झाली होती; हे मला त्याच्या बोलण्यावरून कळत होतं. मी त्याला माझ्याकडं मुक्काम करण्याचा आग्रह केला. तरीही त्याला ते पटलं नाही. जाताजाता तो राहून गेलेली महत्त्वाची गोष्ट बोलला, 'मास्तर ह्यो खर्च मायंदाळा व्हनार, त्यासाठी भावकीतल्या घरपती पाचश्याची वर्गणी काढायचं ठरलंय, आणि लागलीच तुझी वर्गणी बी मला घेऊन यायला सांगिटलंय...!!'

माझ्या भावकीतला दगडू मास्तर मरून बरीच वर्षे झालीत. त्यानं एकट्यानं कधी एकदा ही 'करेवा' केली होती. ती मान्य झाली नाही. त्यानंतर इतक्या वर्षानंतर हा घाट जुळून आला होता. दगडू मास्तरचा थोरला मुलगा मिलिंद आणि धाकटा विद्यानंद हे त्यांच्या जन्मापासूनच मुंबईत वास्तव्याला आहेत. धाकट्याला रोजीरोटी भागेल एवढ्या पगाराची नोकरी आहे. थोरला मात्र शहरात रिक्षा चालवून आपला संसार सांभाळतो. त्याच्या लग्नाला सोळा वर्षे झालीत. मात्र अद्याप त्याला मुलबाळं झालेलं नाही. संसारातल्या सुखासाठी त्यांना मुंबईतला कोणी ज्योतिषी एक दिवस सल्ला देतो, ''तुमच्या भावकीतली कुळस्वामी तुमच्यावरती नाराज आहे. त्यामुळे तुमच्या संसारात अशा अडचणी, संघर्ष चालू आहेत, त्या कुळस्वामीला प्रसन्न करण्यासाठी त्याची जत्रा करावी लागते. ती केली तर तुमच्या मनातली इच्छा पूर्ण होईल.''

संध्याकाळ माझ्या दाराशी आली होती. बबनरावानं गावाकडून आणलेल्या पिशवीत आईनं हाडकं भेंड्या, भाजलेला बांगडा, भुईमुगाच्या शेंगा, भोपळीची पानं असं बरंच काय-बाय दिलं होतं. माझी बायको संध्याकाळच्या जेवणाच्या तयारीला लागली होती. 'वयनी, आता निघतो आमी. जत्रंला सगळी या.' बबनला पाठवण्यासाठी मी स्टँडकडे निघालो. जाताना वाटेत मी नुसताच त्याच्याबरोबर चालत होतो. बोलत काहीच नव्हतो! भावकीनं ठरवलेली घरपती पाचशे रुपयांची वर्गणी मी त्याच्या हातात घालून मोकळा झालो...

मनात नसतानाही जावं लागत होतं. गरजेपुरते कपडे आणि थोडंसं सामान बरोबर घेतलं, एवढ्यात स्वयंपाक घरातून माझ्या बायकोचा सल्ला... 'माळावर उभं राहून बोंबलायला गावच्या पाटलाची परवानगी लागत नाही, तेव्हा सांभाळून! तुमचे विचार, तुमचं तत्त्वज्ञान तुमच्याजवळच असू द्या! भाऊबंदात उगाच तेढ नको...' मी काहीच बोललो नाही. निमूटपणे बॅग काखेला मारली, आणि थेट गाव गाठलं! दिवेलागणीला गावात पोचलो. भावकीतली सगळी जुनी-जाणती माणसं बोलत बसली होती. 'कवा आला मास्तर?' भावकीतल्या एकानं विचारणा केली.

'हे काय आत्ताच आलो.' मी.

घरी चहा घेतला. माणसं भेटायला आली. बायको-पोरं का आली न्हाईत? एकमेकांची विचारपूस आणि बोलण्यात बराच वेळ गेला. भावकीतला बापू मात्र मी आल्यापासून माझ्याबरोबर बोलण्याची टाळाटाळ करीत होता. त्याच्या अशा वागण्याचा मला अर्थच कळेना. तो आता गावाजवळच्या ठिकाणी 'गुरुजी' म्हणून नोकरीला होता. याआधीच्या वर्षात तो माझ्याबरोबर असं कधीच फटकून वागल्याचं मला आठवत नव्हतं. आणि आजच तो असा का वागतो आहे? याचा मला उलगडा होईना. कदाचित त्याच्या मनात माझ्याविषयी काहीतरी गैरसमज झाला असावा; म्हणून मी त्याचे वागणे फारसे मनावर घेतले नाही. पुढे कधी तो आपणहून मला विचारेल त्यावेळी त्याला समजावता येईल या विचाराने मी गप्प राहिलो.

काळाच्या ओघात सगळंच बदलतं, माझी भावकीही त्याला अपवाद नव्हती. बोलता-बोलता जुन्या माणसांच्या आठवणी निघाल्या. त्यापैकी बरीचजणं हे जग सोडून गेली होती. त्यांची पोरं-बाळं, नातवंड आपापला संसार सांभाळण्यात पिचून गेलेली मी जवळून बघत होतो. यातलीच काही तरणीताठी पोरं गाव सोडून शहरात पोट भरण्यासाठी निघून गेली. चार खुटाऱ्यातला सामाईक कार्यक्रम म्हणून मी त्यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत होतो. शेवटी त्या बहुतेकांचं म्हणणं असं पडलं, 'तात्या, तुम्हीच काय ते व्यवस्थित करा. आम्हाला एवढा गाडीखर्च घालून गावी यायला झेपणार नाही.' एका अर्थी त्यांचं बोलणं रास्तही होतं. त्यांना तरी कसा बोल लावायचा?

कोण आलं? कोण राह्यलं? याविषयी प्रचंड कौतुक असणाऱ्या भावकीतल्या चार-पाच बाया गंभीर चेहरा करून एकमेकीत बोलत होत्या, 'अगं, लई शिकलं सवरलं म्हणून माणसाला सगळीच अक्कल येती असं नाही. लई न्हाई थोडं देवाधर्माचं बी बगाया पाह्यजे. देवाला इसरून कसं चाललं? ह्येच्या आज्या-पणज्यापासून चालत आलेली रीत हाय ही...!' असं बरंच काही.

दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच मांडपूजेला सुरुवात होते. बाया-बापडी घरात देवीच्या नैवेद्याच्या तयारीला लागतात. सगळ्यांचीच लगबग चालू असते. थोड्या वेळानं शेजारची कमळाबाई तिथल्या गडीमाणसांना करेवाच्या पूजेची आगाऊ माहिती सांगायला पुढे येते, 'करेवाचं देवस्थान लई वंगाळ हाय. तवा तिचा निवद करताना काय एक इसरू नका. पानं, खारका, काळं लुगडं-चोळी, बईदवार मांडा. आठखुरी मेंढीचा बळी दिल्यावर तिच्या पोटातलं मेंढरू गोठ्यातल्या खड्ड्यात व्यवस्थित घाला.'

माझ्या भावकीत 'करेवा' करण्याची पद्धत वेगळीच आहे. काही ठिकाणी तिच्या पूजेला कोंबड्यांचं पिल्लूही चालतं. मात्र माझ्याच भावकीत तिला 'आठखुरी मेंढीचा बळी' दिल्याशिवाय ती आम्हाला प्रसन्न का होत नाही? हा मला सारखा छळणारा प्रश्न. आत्तापर्यंत वाण्या-ब्राह्मणांच्या भावकीत कधी कुणी करेवा केल्याचं मला आजपर्यंत तरी कळालेलं नाही. तरीही त्यांना आजपर्यंत कधीही 'करेवा' करण्याची गरज पडली नाही. तरीही 'आठखुरी मेंढीचाच बळी लागणाऱ्या करेवा'ची गरज माझ्याच भावकीला का? या प्रश्नाचं उत्तर अजूनही सापडलेलं नाही. एखाद्या निष्पाप प्राण्याची हत्या करणं हा कायद्यानं गुन्हा आहे, हे

मला कळूनही तिचा जीव वाचवण्यासाठी मी मात्र काहीच करू शकत नव्हतो.

देवीच्या पूजेचे विधी मांडायला सुरुवात होते. बहुतेक पुरुष मंडळीच हे सोपस्कार करण्यात गुंतलेले असतात. काळ्या घोंगड्यावर मांड पूजला जातो. देवीच्या प्रातिनिधिक रूपात ठेवलेल्या नारळाच्या खाली काळं लुगडं, काळी चोळी व्यवस्थित ठेवली जाते. हे सगळं उघड्या डोळ्यांनी बघत असतानाच माझ्या शेजारी बसलेला सुदाम तात्या आणखी काही गोष्टी सांगायला सुरुवात करतो, 'मास्तर, देवीच्या पूजेला बाईच्या काकणाचा आवाज जरी आला तरी तिला आवडत नाही. कोण बाई शिवाशिवीची झाली आसंल तर तिची सावलीसुद्धा तिला खपत नाही. नाहीतर एवढं केल्यालं सगळं पाण्यात. जेवल्यानंतर हात धुवायला गोठ्याच्या बाहेर परवानगी नाही, हे सगळं ध्यानात ठेवा; आम्ही गेल्यावर हे सगळं तुम्हास्नीच करावं लागंल...' गाभण मेंढीचा बळी दिला जाणं हा प्रसंगच भयंकर होता.

अंधाराचा तवंग आता गावभर पसरला होता. वाड्यातल्या कुत्र्यांना जत्रेच्या आधीच वास लागला होता. घडत असलेल्या प्रकारामुळं माझं मन थाऱ्यावर नव्हतं. थोडा वेळ या सगळ्या गोंगाटातून मी बाजूला गेलो. जेवणाच्या पंगतीची मांडामांड सुरू झाली आणि थोड्याच वेळात माझा पुतण्या श्रीपती मला शोधत आला. त्याला माझी मानसिकता कळलेली होती. त्यानं मला जेवणाविषयी खूप आग्रह केला, विनंती केली. मला समजावलं, 'भावकीत असं वागून चालणार नाही. ते लोकांना वेगळं वाटतं. मनात नसलं तरी असं चार-चौघात दाखवून चालत नाही बाबा! मनातलं मनातच ठेवायला शिक.' नाईलाजानं मी त्याच्यामागून चालत राहिलो... त्याच्यासोबत जाताना माझी अवस्था मात्र वधस्तंभाकडे जाणाऱ्या कैद्यासारखी झाली होती!!

भावकीतली सगळी माणसं हरकली होती. इतक्या वर्षानं सगळे भाऊबंद, भावकी एकत्र आली होती. नाहीतरी इतर वेळी प्रत्येकजणं भावकीतल्या प्रत्येक घराविषयी अढी बाळगूनच जगत होता. एखाद्याला नोकरी लागली, एखाद्यानं शेत घेतलं तरीही यांच्यातल्या कुणाच्याही मनाला यायचं नाही, मी हे सगळं वातावरण लहानपणापासून बघत आलो होतो. यांची आपल्याच माणसांवरती ईर्षा... मात्र आज करेवाच्या जत्रेला हजारो भुईनळे एकदम फुटावेत आणि त्याचा लख्ख उजेड उजळावा एवढ्या आनंदात सगळीजणं आनंदाच्या धुंदीत बेपर्वा झाली होती.

यात्रा आटोपली. इच्छा नसतानाही मी कसेतरी दोन घासांचं जेवण केलं होतं. थोडा वेळ गेला असेल-नसेल एवढ्यात हाक आली, 'मास्तर, चला बाहीर या; एवढ्यात निजल्यासा? जत्रंचा हिशेब सांगाय पायजे, कुठं खर्च वाढला ते बईदवार भावकीला कळाय पाह्यजे. नाहीतर आम्हीच पैसं खाल्लं आसं व्हईल.' हिशेबाची आकडेमोड सुरू झाली होती. जमलेला प्रत्येकजण समोरच्याला दमात घेऊन बोलाय लागला. आता मात्र प्रसंग बाका होता. करेवाचं काळं लुगडं आणि चोळी भावकीतल्याच विधवा असणाऱ्या स्त्रीनं घेण्याची प्रथा. त्याची पडेल ती किंमत देऊन भावकीतल्याच विधवा स्त्रीनं घेण्याची चालत आलेली परंपरा. पण त्याची किंमत देण्याइतपतही त्यांची ऐपत नव्हती. त्या कारणानं त्या बिचाऱ्या रंजीस झाल्या होत्या. एवढ्यात नानू आबा उठला, म्हणाला, 'देवीचं लुगडं आणि चोळी विकायची नसती. तिची सूप-दुरडी, चोळी-लुगडं तिच्याच जवळ ठेवा.' यावर कुणीच काही बोललं नाही. चालू झालेल्या चर्चेचा एखादासा घोळ मिटला. कुणाच्या मनात कशाचीच शंका उरली नव्हती. सगळेजणं आपापल्या घराकडे निघून गेले.

रात्र वाढतच होती. काही केल्या मला झोप येईना. एकसारखी ती गाभण मेंढी, तिचे पाणावलेले घारे डोळे, देवीचं चोळी-लुगडं काही केल्या मनातून जाता जात नव्हतं. मी झोपलो की नाही हे पाहण्यासाठी आई पुन्हा आली. माझ्या उघड्या डोळ्यांआड बघून म्हणाली, 'लेका, रात लय झाली. नीज की आता. सकाळ उठून कामावर जाया पायजे!' अंगावर वाकळ ओढून मी नुसता झोपल्याचं सोंग करतो. अशावेळी माझ्या डोळ्यांत दीक्षाभूमीवर जीव तोडून कळकळीने भाषण देणारे बाबासाहेब आठवत आठवू लागतात!

तांबडं फुटायच्या आधीच माझी आई उठली होती. तिनं मलाही उठवलं. काळ्या पाण्याचा चहा दिला. जागून काढलेल्या रात्रीत मी कित्येकवेळा त्या गाभण मेंढीसाठी, तिला होणाऱ्या पिलासाठी उशीवर आसवं गाळली होती; मी तिच्यासाठी अर्पण केलेली ती माझी स्वत:ची अबोल श्रद्धांजलीच होती! थळोबा, मसोबा, रांगीतली आई, 'करेवा' हे सगळं थोतांड आहे, त्यांची जत्रा करून आपलं भलं होणार नाही. आपण शिक्षण घेतलं पाहिजे. प्रयत्न करून जिद्दीने चार पैसे मिळविले पाहिजेत. बाबासाहेबांनी आमच्या प्रगतीसाठी स्वत: एवढे कष्टाचे पर्वत चिरडले त्या बाबासाहेबांच्या विचारांचे अनुकरण करायचे सोडून ही माझ्या भावकीतली माणसं कोणत्या वाटेनं चालली आहेत... मी त्यांना हे सगळं कोणत्या तोंडानं सांगणार होतो? आणि प्रयत्न करून सांगितलंही, तर ते माझ्यावर विश्वास दाखवतील? माझाच माझ्यावरचा ताबा आता सुटू लागला होता. माझ्या भोवतीनं गोळा झालेला अंधार मला गिळण्यासाठी अंगावर येत होता.

आता मी ठरवलं होतं, काही झालं तरी इथून पुढं भावकीच्या फंदात पडायचं नाही. जी गोष्ट आपल्या विचारांना पटते तीच करायची, त्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल! असा विचार करतच मी घरी आलो. बायकोने विचारलं, 'कशी झाली जत्रा?'

मी आता तिच्याशी काहीच बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हतो...

---

**प्रा. गौतम कांबळे**
'प्रज्ञाभवन', आयडियल कॉलनी,
ता. आजरा ४१६५०५
भ्रमणध्वनी : 9423824887

---

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१

**दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र. ०२०/२६१२२४८५**

**निविदा सूचना क्रमांक ५१ सन २००८-२००९**

खालील कामांच्या सिलबंद निविदा **कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१** (दुरध्वनी क्रमांक **२६१२२४८५/२६१२२४१४**) हे महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. सीएटी/१०९६/प्र.क्र. १७२/इमारती-२, दि. ११-२-२००० अन्वये सुधारीत नियमाप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना **कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे** यांचेकडून दिनांक **१३/०१/२००९ ते २७/०१/२००९** पर्यंत **सकाळी ११.०० ते दुपारी ४.००** वाजेपर्यंत या कार्यालयीन वेळेत देण्यात येतील. तसेच भरून पाठविलेल्या निविदा दिनांक **३१/०१/२००९** रोजी **सकाळी १२.००** वाजेपर्यंत स्विकारतील आणि त्याच दिवशी **दुपारी १.०० नंतर** (शक्य झाल्यास) उघडतील.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत रूपये (रू. लाखात) | इसारा रक्कम रूपये | काम पूर्ण करण्याची मर्यादा | निविदा नमुना प्रकार | कोऱ्या निविदेची किंमत रूपये | निविदा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २ पुणे येथील १२० पोलीस निवासस्थानाकरीता प्रसाधनगृहाचे बांधकाम करणे. | १६.१० | १६१००/- | ६ महिने | ब-१ | १०००/- | वर्ग ५ अ व त्यावरील |
| २. | सर्वसाधारण रूग्णालय, औंध, पुणे येथील ५६ परिचारीका निवासस्थाने इमारतीची दुरूस्ती करणे. मनोरंजन हॉल, व डायनिंग हॉल बांधणे. | १५.७४ | १५७४०/- | ६ महिने | ब-१ | १०००/- | वर्ग ५ अ व त्यावरील |
| ३. | सर्वसाधारण रूग्णालय, औंध, पुणे येथील मुख्य इमारतींचे तिसऱ्या मजल्यावरील हॉलचे नुतनीकरण करणे. | १८.४९ | १८४९०/- | ६ महिने | ब-१ | १०००/- | वर्ग ५ अ व त्यावरील |

टिप : (१) कोरे निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
(२) एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क राखून ठेवला आहे.
(३) सदर निविदा सूचना रद्द करणे अथवा त्यामध्ये बदल करण्याचे हक्क राखून ठेवला आहे
(४) वरील कामांची निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **www.mahapwd.com** या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता,**
**पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पुणे -४११ ००१.**

मावका-पुणे- ५८८

प्रतिसाद

## अंतुले यांची हकालपट्टी न करणे म्हणजे अल्पसंख्यांकांच्या देशभक्तीविषयी शंका घेणे!

बॅ.अंतुले यांची एटीएसचे प्रमुख हेमंत करकरे यांच्या हत्येविषयी संशय घेणारी वक्तव्ये ही देशाची तसेच देशप्रेमी मुस्लिम जनतेची अपरिमित हानी करणारी आहेत. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर सर्व भारतीय जातपात, धर्म, प्रांत विसरून एक झाले होते. मुस्लिम बांधवांनी 'ईद' साधेपणाने साजरी केली. त्यांच्या धर्मगुरुंनी दहशतवाद्यांचे मुडदे आपल्या कबरस्तानात दफन करण्यास नकार दिला. अशा परिस्थितीत अंतुले यांची मुक्ताफळे ही पूर्णपणे देशद्रोही, हिंदू-मुसलमानांमध्ये फूट पाडणारी व आपला शत्रू, तसेच दोन्ही धर्मातील जातीयवाद्यांना बळ देणारी आहेत. अबू आझमी कंपनीने ताबडतोब अंतुले यांच्या विधानांना पाठिंबा देणे स्वाभाविक होते. कारण दहशतवाद्यांचा निषेध करावा लागण्याच्या धर्मसंकटातून त्यांची सुटका झाली. मालेगाव बॉंबस्फोटाचे संशयित सापडल्यानंतर व हेमंत करकरे यांनी त्यांच्याविरुद्ध सज्जड पुरावा गोळा केल्यानंतर हिंदू जातीयवादी बचावात्मक पावित्र्यात गेले होते. साध्वी आणि कंपनीचा बचाव आपण आता फार काळ करू शकणार नाही, याची जाणीव त्यांच्या पुढारी मंडळींना झाली होती. अशा परिस्थितीत हेमंत करकरेंना हिंदू जातीयवाद्यांनी मुद्दाम कामा हॉस्पिटलजवळ दहशतवाद्यांकडून बळी जाण्याच्या हेतूने पाठविले असावे, असा जावईशोध लावून (बचावात्मक पावित्र्यात असणाऱ्या ह्या) हिंदू जातीयवाद्यांना अंतुले यांनी जीवदानच दिले आहे. पाकिस्तानमध्ये तर आनंदाच्या उकळ्याच फुटल्या असतील.

६ डिसेंबर १९९२ रोजी हिंदू जातीयवाद्यांनी भारताची दुसरी वैचारिक फाळणी केली. अंतुले यांनी आता तिसरी फाळणी केली आहे. ते बॅ.जीना व लालकृष्ण आडवाणी यांच्या पंक्तीत जाऊ बसले आहेत. अंतुले यांच्या देशप्रेमाबद्दल आत्तापर्यंत कोणाच्याही मनात संशय नव्हता. (त्यांच्या राजकीय कारकिर्दीविषयी फारसे प्रेम नसले तरीही). परंतु त्यांच्या या अविचारी विधानांनी फक्त त्यांच्याविषयीच नव्हे, तर भारतीय मुस्लिम समाजाविषयीही अनेक भारतीयांच्या मनात संशयाचे बीज पेरले गेले आहे.

'हेमंत करकरे यांना कामा हॉस्पिटलजवळ दहशतवाद्यांच्या तोंडी देण्यासाठी कोणी पाठविले, याची मी फक्त चौकशीची मागणी करीत होतो,' असा अंतुले यांचा पवित्रा भंपकपणाचा एक अस्सल नमुना आहे

हेमंत करकरे यांना कामा हॉस्पिटलजवळ कोणी पाठविले, असा प्रश्न विचारणारे अंतुले हे विजय साळसकर किंवा अशोक कामटे यांनाही त्या ठिकाणी कोणी पाठविले याविषयी गप्प दिसतात. विजय साळसकर यांच्या हत्येने बऱ्याच स्मगलर्स व गुडांनी सुटकेचा नि:श्वास टाकला असणार. छत्रपती शिवाजी स्थानकावर ६१ निरपराधांची हत्या करून दहशतवादी कामा हॉस्पिटल परिसरात गेल्याची माहिती कळल्यावर त्या ठिकाणी पोलीस जाणार नाहीत तर कोण जाणार?

या सर्व प्रकरणात वाईट वाटते ते केंद्रीय नेतृत्वाच्या नाकर्तेपणाचे. अंतुले यांचे विधान प्रसिद्ध होताक्षणीच मंत्रिमंडळातून त्यांची हकालपट्टी करणे जरूर होते, पण अल्पसंख्यांकांच्या मतांची मोजणी करीत कॉंग्रेसश्रेष्ठींनी ते टाळले. यात अल्पसंख्यांच्या देशभक्तीविषयी शंका घेऊन आपण त्यांचा अपमान करीत आहोत, असे क्षणभरसुद्धा या नेत्यांना वाटले नाही का?

**रमेश पां. दोंदे,** १/५ मधुकुंज को. हौसिंग सोसायटी, बोरिवली (पूर्व), मुंबई ४०००६६.

## मुंबईवरील हल्ल्याचे राजकारण कुठपर्यंत करणार?

मुंबईत झालेल्या भीषण दहशतवादी हल्याला आता एक महिना लोटलाय. गेला महिनाभर सर्व माध्यमांनी हा हल्ला यथेच्छपणे विविध अंगांनी चघळला. सुरुवातीला हल्ल्यामागच्या कारणांची चर्चा झाली. नंतर भारत-पाकिस्तान यांच्यातल्या तणावाच्या मुद्याने केंद्रस्थानी जागा फटकावली. हल्ल्याच्या भीषणतेचे पडसाद जगभर उमटले. केंद्र सरकारने आणि राष्ट्रीय पातळीवरील व्यवस्थेने हल्ल्याचे गांभीर्य समजून घेतले. पण महाराष्ट्राच्या सत्ताधाऱ्यांनी मात्र या हल्ल्याकडे फारसे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही. गेल्या महिनाभरात या हल्ल्याच्या निषेधाच्या आणि मृत लोकांना श्रद्धांजलीच्या बातम्यांनी वृत्तपत्रे भरुन गेली. मेणबत्त्या लावून श्रद्धांजली वाहायची आणि वेळ आल्यावर डोळे झाकून गंमत पहायची असा आमचा धंदा. गेल्या आठवड्यात तर पुण्यात आणि इतरही ठिकाणी दहशतवादविरोधी शपथ घेण्याचा पराक्रम झाला. खरे तर हा प्रश्न मंत्र्यांना घरी पाठवून सुटत नाही, मग सामान्यांनी शपथ घेतल्याने हा प्रश्न सुटेल? हल्ल्याच्या विरोधी किंवा एकूण दहशतवादाच्या विरोधी लढण्यासाठी काहीतरी ठोस भूमिका घेण्याची शपथ घ्यावी लागेल. नुकत्याच संपलेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात मुंबईतील हल्ल्याबाबत गांभीर्यने चर्चा होईल अशी अपेक्षा होती. विरोधी पक्षांनी त्या मानाने चहापानाचा वाद सोडून बरीच नैतिक भूमिका घेतली. (सत्तेचा वेध असल्यामुळे). पण तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव मात्र अधिवेशनाकडे तब्बल आठवड्यानंतर फिरकले. तेही राणेसोबत गेल्याने माध्यमांना बातमी मिळाली. पार ते दोघेजण कोणत्या विमानातून व कोणत्या हॉटेलात गेले इथंपर्यंत. पण साऱ्या महाराष्ट्रात हजारो शेतकरी आत्महत्या करीत होते तेव्हा या माध्यमांनी किती फोटो आणि किती बातम्या छापल्या?

मुंबईच्या हल्ल्याने भारत-पाक यांच्यात युद्धाचे ढग जमले असताना काँग्रेस कार्यकर्त्यांनी विलासरावांचे नागपुरातील स्वागत जणू काही ते किल्ला जिंकून आलेत अशा थाटात केले. राणे हे विलासरावांवर आगपाखड करीत होते त्यावेळी फक्त लातूरमध्ये राणेंचा पुतळा जाळण्यात आला. म्हणजे त्या कार्यकर्त्यांनी विलासराव फक्त लातूरपुरते किंवा त्यांच्या विधानसभा मतदारसंघापुरते मर्यादित असल्याचे दाखविले.

मुंबईच्या हल्ल्याने अनेक ठिकाणांच्या विषयपत्रिका बदलल्या, पण त्या हल्ल्याचे राजकारणच जास्त झाले. राजीनाम्यांच्या राजकारणाचे विषय माध्यमांनी चघळले, त्यामुळे मूळ प्रश्नांचे गांभीर्य कमी झाले.

मुंबईचा हल्ला हा आधुनिक स्वरूपाच्या दहशतवादी हल्ल्याचा नमुना होता. काहींच्या मते तर ही सुरुवात आहे. पण बॅ.अंतुलेंनी आपण अल्पसंख्यांकांचे मंत्री आहोत हे दाखवण्यासाठी करकरेंच्या मृत्यूबाबत शंका उपस्थित केली. सर्व बाजूंनी अंतुलेंच्या भूमिकेवर आगपाखड झाली. पण काँग्रेसने त्यांच्यावर कारवाई केली नाही. कारण मुस्लिम विरोधात जातील. यात मुद्दा असा आहे की, मुंबईवरील हल्ल्याचे केवळ राजकारण कुठपर्यंत करणार?

**किशोर रत्काटे,** राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

## रंगनाथ पठारे यांचे बीजभाषण आवडले!

'साधना' साप्ताहिकात प्रसिद्ध झालेले 'साधना साहित्य संमेलना'तील श्री.रंगनाथ पठारे यांचे बीजभाषण वाचले. भाषण अतिशय आवडले. मी पठारे यांना फोनही लगेच केला. सविस्तर पत्रही पाठवावेसे वाटले.

ते भाषण वाचून मला ओमार पामुख यांनी नोबेल पारितोषिक स्वीकारताना केलेल्या भाषणाची आठवण झाली. साहित्यनिर्मितीसंबंधी (व साहित्यिकांच्या साहित्यिक जबाबदाऱ्यांसंबंधी) काही प्रसिद्ध इंग्रजी लेखकांच्या तोडीचे (उदा. सुसान सोन्तारा, झैदी स्मिथ) ते भाषण आहे. म्हणूनच त्या भाषणावरील टीका वाचून आश्चर्य वाटले. श्री.पठारे यांचे अभिनंदन!

तसेच लोकवाङ्मय गृहाने प्रसिद्ध केलेले त्यांचे आणखी एक भाषण काही महिन्यांपूर्वी मी वाचले होते. तेही मला खूप आवडले. तेथूनच मला 'टीकास्वयंवर'चा संदर्भ मिळाला. ते पुस्तक आज माझ्या आवडत्या पुस्तकांपैकी एक आहे.

**भूषण निगळे,** बेंगलोर, ५६००७५

## मी पळशीकरांना अशी विनंती करतो की...

भूमिपुत्रांना प्रत्येक क्षेत्रात प्राधान्य द्यावे की देऊ नये या प्रश्नावर विचारवंत रवंथ करीत असताना दिसतात, पण मुळात हा प्रश्न का पडावा हेच कळत नाही. स्थानिकांचे हितरक्षण करणे व त्यातून त्यांचा विकास घडवणे हे प्रत्येक राज्यसरकारचे कर्तव्य आहे. सर्व राज्य सरकारांसाठी हे समान सूत्र असेल. तर त्याविरुद्ध ओरड का? पण अशी ओरड होते. २० डिसेंबरच्या साधना अंकातील श्री.सुहास पळशीकर यांचा लेख त्या प्रकारचा वाटतो.

त्यांनी बहुविधता हा विषय नव्याने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ते एक चित्र रंगविताना असे म्हणतात की, स्थानिक विद्यार्थ्यांना ८० टक्के जागा ठेवून उरलेल्या जागा परप्रांतीयांना अधिक फी आकारून देण्यात आल्या तर त्यात स्थानिकांचे हितरक्षण होते आणि किमान बहुविधतेची हमी राहते. यात ते म्हणतात तशी विसंगती असली तरी नुकसान काय व कोणाचे आहे? त्यांच्या सरकारने शैक्षणिक सुविधा न पुरविल्याने परप्रांतीयांना अधिकची फी भरावी लागते याला ती सरकारे जबाबदार आहेत. जी राज्ये आपल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज पुरवीत नसतील त्या राज्यांनी, जी राज्ये अशी गरज पुरवितात त्या राज्यांना, आर्थिक सहकार्य केले पाहिजे. तशी कायद्यात तरतूदही आहे. अशा तरतुदींचे पालन होत असल्याचे दिसत नाही. किंबहुना तशी राजकीय इच्छाशक्तीही दिसत नाही. या तरतुदीचे काटेकोर पालन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत मागासलेली राज्ये विकासासाठी पुढे येणार नाहीत. त्यांचा भार विकसित राज्यांना स्थानिकांच्या विकासाची किंमत देऊन सोसावा लागेल. दुसरे असे की, प्रांतांचा समतोल विकास होणार नाही जो अपेक्षित आहे.

स्थानिक व परप्रांतीय यांची समसमान संख्या असेल तरच बहुविधता परिणामकारक ठरेल असे नाही. बहुविधता प्रथम राज्यातील स्थानिकांचा विकास लक्षात घेऊन टप्प्याटप्प्याने यायला हवी. यामुळे स्थानिकांना स्थिर व्हायला पुरेसा वेळ मिळेल व ते या संकल्पनेचा अंगिकार करतील, पण नेमके याउलट मुंबईत अनुभवायला येते. मुंबईत राज्य सरकारने दुर्लक्ष केल्याने बहुविधता प्रमाणाबाहेर वाढली असून, ती डोईजड होऊ लागली आहे. स्थानिकांचे भय उरले नसल्यानेच एक पोलीस अधिकारी 'मुंबई कोणाच्या बापाची नाही' असे विधान करू शकतो. राज्यात येणाऱ्या लोंढ्याला वेळीच आवर घातला नाही तर, जी स्थिती मुंबईची तीच स्थिती महाराष्ट्राची व्हायला वेळ लागणार नाही व ते न्याय देण्याच्या नावाखाली अन्यायाचे ठरेल.

महाराष्ट्रातील बुद्धिवाद्यांना अन्यायाशी भिडण्याचे व लढण्याचे सामर्थ्य उरलेले नाही. ते लढण्याऐवजी अन्यायाला नवीन गोंडस नाव देऊन तेच न्याय्य असल्याचे ठरवून आपल्या मनाची समजूत काढतात. इतरांचा बुद्धीभेद करून त्यांनी तसे मानावे अशी त्यांची अपेक्षा असते. हे कोठेतरी थांबायला हवे. आज भाषावार प्रांतरचना मोडीत निघाल्याचे भासविले जात आहे व नवीन संकल्पना जन्म घेत आहेत, त्यामुळे लोकांमधील गोंधळ वाढत चालला आहे. मी पळशीकरांना अशी विनंती करतो की, त्यांनी भाषावार प्रांतरचना ही संकल्पना, तिचे फायदे व ती अपयशी का ठरली याची कारणे यावर लेख लिहावा, ज्यामुळे आम्हाला बहुविधतेचे महत्त्व व तिची गरज लक्षात येईल व पुढील निर्णय घेणे सोपे जाईल.

**शरद खेडेकर,** सहयोग, आनंदविहार, खार (पु.) मुंबई ५२।

## बाबा भांड यांच्या कादंबऱ्या : नव्या आवृत्त्या




५०१ स्वरचित अभंगांतून धर्मतत्त्वज्ञान सांगणाऱ्या, स्वतःची चिता स्वतःच रचून समाधिस्त होणाऱ्या आणि ज्ञानेश्वरांची आठवण करून देणाऱ्या एका तरुण योग्याची काळजाला भिडणारी कादंबरीमय गाथा.

**कृष्णा : अग्निसमाधीतला**

# योगी

दुसरी आवृत्ती

किंमत : २००/-

पृष्ठे : २४०




लोकविलक्षण, उपेक्षित, धाडसी आदिवासी जननायकाची सर्जनाच्या पातळीवर इतिहासाचे पुनर्वाचन करणारी लक्षणीय कादंबरी.

# तंट्या

चौथी आवृत्ती

किंमत : ३५०/-

पृष्ठे : ५७६




दुसऱ्यांच्या मरणावर ज्यांची पोटं आहेत, हे विलक्षण वास्तव दशक्रियेत जसं येतं, तसेच साने गुरुजींच्या विशाल मानवी करुणेची इथं आठवण होते.

# दशक्रिया

आठवी आवृत्ती

किंमत : १५०/-

पृष्ठे : २२८

## साकेत प्रकाशन प्रा. लि.

११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड, औरंगाबाद - ४३१ ००५.
दूरध्वनी : (०२४०) २३३२६९२, २३३२६९५, ९८२२४७८८९५.
**Email :** info@saketpublication.com **Website :** www.saketpublication.com

**साधना साप्ताहिक**
१७ जानेवारी २००९

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल–२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू–१७८/२००९–२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून






प्रत्येक लेकीसाठी तिचा बाप
हा असामान्य असतो.
अशा लौकिकार्थानेही असामान्य असलेल्या
पित्याच्या आठवणींतून साकारलेले
**तें नावाचे बाबा रु : १००.००**

His fifth woman या विजय तेंडुलकर
लिखित इंग्रजी नाटकाचा
चंद्रशेखर फणसळकरांनी
केलेला स्वैर अनुवाद
**त्याची पाचवी रु : ४०.००**

विजय तेंडुलकरांची इतर प्रकाशित नाटके :—

| | | |
|---|---|---|
| ■ अशी पाखरे येती | ■ एक हट्टी मुलगी | ■ कमला |
| ■ कन्यादान | ■ कावळ्यांची शाळा | ■ कुत्रे |
| ■ गिधाडे | ■ घरटे आमुचे छान | ■ घाशीराम कोतवाल |
| ■ श्रीमंत | ■ चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी | ■ झाला अनंत हनुमंत |
| ■ दंबद्वीपचा मुकाबला | ■ नियतीच्या बैलाला | ■ पाहिजे जातीचे |
| ■ फूटपायरीचा सम्राट | ■ बेबी | ■ भल्याकाका |
| ■ भाऊ मुरारराव | ■ मधल्या भिंती | ■ माणूस नावाचे बेट |
| ■ मित्राची गोष्ट | ■ मी जिंकलो! मी हरलो! | ■ विठ्ठला |
| ■ शांतता! कोर्ट चालू आहे | ■ सखाराम बाइंडर | ■ सफर |
| ■ सरी ग सरी | ■ चिमणीचं घर होतं मेणाचं | |
| ■ समग्र एकांकिका: भाग १ ते ३ | | |



**पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.**
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ ☎ २३५३०३०३
Email : info@popularprakashan.com Website: www.popularprakashan.com